# बिसेन डेन्टल केअर

डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)



दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)



ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक १८ | बुधवार, दि.०८ ते १४ एप्रिल २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


## नागपूर विभाग महसूल वसुलीत आघाडीवर

### आर्थिक वर्षात १०४ टक्के महसूल वसुली-विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी

**नागपूर :-** राज्य शासनाकडून नागपूर विभागाला जमीन महसूल आणि गौण खनिज अंतर्गत आर्थिक वर्ष २०२५-२६ करिता देण्यात आलेल्या १ हजार ३३ कोटी ४१ लाख रुपये उद्दिष्ट्याच्या तुलनेत १ हजार ८० कोटी ७६ लाख ८८ हजारांची म्हणजेच १०४.५८ टक्यांची वस-




ुली झाल्याची माहिती विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी दिली.

नागपूर विभागातील जिल्ह्यांमध्ये जमीन महसुलाचे स्त्रोत कमी असल्यामुळे जमीन महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी निर्माण झालेली अडचण विभागात गौण खनिज वसुलीद्वारे भरून काढण्यात आली आहे.

राज्याच्या महसूल विभागाकडून नागपूर विभागाला १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत गौण खनिजापोटी ७०० कोटी महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. विभागात उदिष्ट्याच्या तुलनेत ८३१ कोटी २७ लाख ८७ हजार म्हणजेच ११८.७५ टक्के महसूल वसुली झाली. तर विभागाला १ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ पर्यंत जमीन महसुला पोटी ३३३ कोटी ४१ लाख ७२ हजार कोटी महसूल वसुलीचे उद्दिष्ट देण्यात आले होते. विभागात उदिष्ट्याच्या तुलनेत २४९ कोटी ७ लाख ९२ हजार म्हणजेच ७४.७० टक्के जमीन महसूल वसुली झाली.

### गौण खनिज वसुलीत भंडारा जिल्हा विभागात आघाडीवर

**गेल्या आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या १०० कोटीच्या उद्दिष्टाच्या तु-लनेत १९९ कोटी ५४ लाख ६९ हजारांची म्हणजेच १९९.५५ टक्के गौण खनिज वसुली करत भंडारा जिल्हा नागपूर विभागात अव्वल ठरला. एकूण उद्दिष्टांपैकी गोंदिया जिल्ह्याने ११८.६६ टक्के, चंद्रपूर जिल्ह्याने १०७.८६ टक्के, नागपूर जिल्ह्याने १०६.४२ टक्के तर गडचिरोली जिल्ह्याने १०४.४४ टक्के आणि वर्धा जिल्ह्याने ८४.३५ टक्के गौण खनिज वसुली पूर्ण केली आहे.**

### जमीन महसूल वसुलीत वर्धा जिल्हा विभागात प्रथम

**गेल्या आर्थिक वर्षात देण्यात आलेल्या ३० कोटी ३७ लाख ७० हजार कोटींच्या उद्दिष्टाच्या तुलनेत ३१ कोटी ९६ लाख १९ हजारांची म्हणजेच १०५.२२ टक्के जमीन महसूल वसुली करत वर्धा जिल्हा हा नागपूर विभागात प्रथम स्थानावर राहिला. एकूण उद्दिष्टांपैकी गडचिरोली जिल्ह्याने ८७.९२ टक्के, चंद्रपूर जिल्ह्याने ८७.०३ टक्के, गोंदिया जिल्ह्याने ७४.३१ टक्के तर नागपूर जिल्ह्याने ६६.४१ टक्के आणि भंडारा जिल्ह्याने ५७.५६ टक्के जमीन महसूल वसुलीचे उद्दिष्ट पूर्ण केले आहे. गेल्या आर्थिक वर्षात जमीन महसूल आणि गौण खनिज महसूल वसु-लीत उत्तम कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांचे विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी अभिनंदन केले आहे.**

## नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्रथम प्राधान्य: जिल्हाधिकारी डॉ.मंगेश गोंदावले



### पत्रकारांशी झालेल्या संवादात दिली माहिती

**गोंदिया:-** जिल्हाधिकारी म्हणून नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्रथम प्राधान्य राहील, असे नवनियुक्त जिल्हाधिकारी डॉ. मंगेश गोंदावले यांनी पत्रकारांशी झालेल्या वार्तालापत सांगितले.

गोंदिया जिल्ह्याचे जिल्हाधिकारी म्हणून डॉ.मंगेश गोंदावले यांनी आज पदभार ग्रहण केला असून त्यांनी पहिल्याच दिवशी पत्रकारांशी संवाद साधला. त्यावेळी ते बोलत होते. डॉ . गोंदावले हे वर्ष २०१५ च्या बॅचच्या भारतीय प्रशासकीय सेवेचे अधिकारी आहेत. यापूर्वी ते महाराष्ट्र कृषी औद्योगिक विकास महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक पदावर कार्यरत होते.

मुळचे सातारा जिल्ह्याचे अस-लेले डॉ.गोंदावले यांनी इंडस्ट्रीयल इकॉनॉमिक्स या विषयात पी.एच.डी. केली आहे. विदर्भात काम करण्याची त्यांची ही पहिलीच वेळ आहे.

जिल्ह्यातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यास प्राधान्य राहील असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रशासन हे लोकाभिमुख असले पाहिजे. प्रशासनात काम करीत असतांना त्याचे परिणाम प्रत्यक्ष दिसले पाहिजेत. जिल्ह्यातील नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सकारात्मक दृष्टीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

### रस्त्यांच्या कामाचा आढावा घेणार

**गोंदिया जिल्ह्यात येताना बऱ्याच ठिकाणी रस्त्यांची कामे सुरु दिसली. अनेक ठिकाणी कामे अपूर्ण असल्याचे आढळले. शिवाय जिल्ह्यात अपघातांचे प्रमाण सुद्धा अधिक असल्याची माहिती समोर आली. त्यामुळे जिल्ह्यात रस्त्यांची किती कामे सुरू आहेत. किती कामे अपूर्ण आहेत आणि किती कामे मुदतीत पूर्ण झाली या सर्व गोष्टींचा आढावा लवकरच घेणार असून, यात सुसूत्रता आणण्यावर भर देणार असल्याचे जिल्हाधिकारी गोंदावले यांनी सांगितले.**

### सारस संवर्धनावर भर देणार

**सारसांचा जिल्हा अशी गोंदिया जिल्ह्याची ओळख आहे. पण सारस पक्ष्यांची संख्या हळूहळू कमी होत आहे. ही गंभीर बाब आहे. त्यामुळे यावर काम करण्याची गरज आहे. सारस संवर्धनासाठी काय उपाययोजना करता येईल या दृष्टीने अभ्यास करणार असल्याचे जिल्हाधिकारी गोंदावले यांनी सांगितले.**

गोंदिया जिल्हा हा धान उत्पादन जिल्हा आहे. त्यामुळे जिल्ह्यातील धान, बांबू, मोहफूल यांना प्राधान्य देवून बांबूपासून तयार करण्यात आलेल्या वस्तूंकडे विशेष भर येत्या काळात देण्याचा प्रयत्न असेल. नागरिकांचे जीवनमान उंचावयाचे असेल तर आर्थिक उन्नती करणे आवश्यक आहे, असे त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, जिल्हा माहिती अधिकारी अंजु कांबळे-निमसरकर व जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे उपस्थित होते.

## अपूर्ण सभागृहाचे बांधकाम लवकर पूर्ण करा

**गोंदिया:-** शहरातील रेलटोली येथे नाट्यगृह संकुलाचे बांधकाम सुरू झाले होते, परंतु ते अनेक वर्षांपासून रखडले असून त्याची अवस्था दयनीय झाली आहे. त्याचबरोबर, अपूर्ण बांधकामामुळे गांजा ओढणारे आणि दारू पिणारे लोक येथे येऊ लागले असून, त्यांनी या जागेला अमली पदार्थांचा अड्डा बनवले आहे आणि नगर परिषदेच्या कोट्यवधी रुपयांच्या मालमत्तेचे नुकसान करत आहेत. या परिस्थितीत, रेलटोली भागाचे माजी नगरसेवक आणि भाजप मंडळ अध्यक्ष ऋषिकांत साहू यांनी आमदार विनोद अग्रवाल यांना एक निवेदन सादर करून या सभागृहाचे काम सुरळीत करून त्याचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्याची मागणी केली आहे. भाजपचे जिल्हा महासचिव सुनील केलांका, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष रोहित अग्रवाल, नगरपालिकेचे सेवक जितेंद्र पंचबुद्धे यांच्या नेतृत्वाखाली ऋषिकांत साहू यांनी आमदार विनोद अग्रवाल यांना सरकारकडून आवश्यक निधी मंजूर करून कामाची लवकरात लवकर सुरुवात करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

## से.नि.शिक्षिका ताराबाई कटरे यांचे निधन

**गोंदिया:-** गोरेगाव तालुक्यातील दवडीपार येथील प्रतिष्ठित नागरिक सेवानिवृत्त मुख्याध्यापक हिरदीलाल कटरे यांच्या पत्नी ताराबाई कटरे यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी ६ एप्रिल रोजी दिर्घ आजाराने निधन झाले.त्यांच्यावर आज ७ एप्रिल रोजी दवडीपार या स्वगावी अंत्यसंस्कार करण्यात आले.त्या बेरार टाईम्सचे संपादक वरिष्ठ पत्रकार, ओबीसी चळवळीचे



सक्रिय पदाधिकारी खेमेंद्र कटरे यांच्या मातोश्री होत.त्यांच्या मागे सेवानिवृत्त कार्य.अभियंता संजय कटरे,से.नि.शिक्षक राजेंद्र कटरे,शिक्षक अजय कटरे व खेमेंद्र कटरे अशी ४ मुल,सुना व नातवंड असा बराच मोठा आप्तपरीवार आहे.श्रध्दांजली सभेला जिल्ह्यातील राजकीय,सामाजिक,पत्रकार क्षेत्रा-तील मान्यवरासंह नातेवाईकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## "सोशल मीडिया' वरील संशोधनासाठी माहिती संचालक किशोर गांगुर्डे यांना पीएच.डी.

**मुंबई:-** राज्याचे माहिती आणि जनसंपर्क संचालक किशोर गांगुर्डे यांना जळगाव येथील कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाने "वृत्तपत्रविद्या आणि जनसंज्ञापन' विषयातील पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे. कुलगुरु डॉ. विजय माहेश्वरी यांच्या हस्ते श्री. गांगुर्डे यांना पीएच.डी. पदवीची अधिसूचना देऊन सन्मानित करण्यात आले.

"महाराष्ट्र शासनाच्या माहिती प्रसारणासाठी समाजमाध्यमांचा वापर आणि प्रभाव : एक अभ्यास' या विषयावर श्री. गांगुर्डे यांनी संशोधन करुन शोधप्रबंध सादर केला होता. शासनाचे निर्णय, लोकाभिमुख योजना, धोरणे आणि माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात समाजमाध्यमांची भूमिका किती प्रभावी ठरते, याचे सखोल विश्लेषण त्यांनी या संशोधनात केले आहे. या संशोधनासाठी त्यांना विद्यापीठातील माध्यमशास्त्र प्रशाळेचे माजी संचालक प्रा. डॉ. सुधीर भटकर यांचे मार्गदर्शन लाभले.

राज्य शासनाच्या सेवेतील जनसंपर्क व प्रसिद्धीविषयक कामाचा दोन दशकांपेक्षा अधिक कालावधीचा अनुभव तसेच माहिती व जनसंपर्क विभागात सोशल मीडिया शाखेची त्यांनी केलेली सुरुवात यामुळे श्री. गांगुर्डे यांचे हे संशोधन महत्त्वाचे मानले जाते. शासकीय माहिती प्रसारासाठी शासनात सोशल मीडियाची सुरुवात करुन उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल २०१८ मध्ये नागरी सेवा दिनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते गांगुर्डे यांना सन्मानित करण्यात आले आहे.

## धान विक्रीकरीता ऑनलाईन शेतकरी नाव नोंदणी सुरु

**गोंदिया :-** शासकीय आधारभुत किंमत खरेदी योजनेअंतर्गत रब्बी पणन हंगाम २०२५-२६ मधील धान विक्रीकरीता शासनाचे अधिकृत इएअच पोर्टलवर शेतकऱ्यांची ऑनलाईन नाव नोंदणी १ ते ३० एप्रिल २०२६ पर्यंत करण्याकरीता शासनाकडून सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यातील सर्व धान उत्पादक शेतकऱ्यांनी ऑनलाईन नोंदणी करण्याकरीता आवश्यक त्या कागदपत्रासह जसे- रब्बी पणन हंगाम २०२५-२६ चा पीक पेरा नोंद असलेला ऑनलाईन ७/१२ उतारा व नमुना ८, आधार कार्ड, बँक पासबुक, मोबाईल नंबर, सामुहिक ७/१२ उतारे जमा करावे.

## जि.प.बांधकाम विभागात उप अभियंता,अधिक्षक उघड्यावर,वरिष्ठ सहाय्यक मात्र शाही थाटात



**गोंदिया(खेमेंद्र कटरे)-** गोंदिया जिल्हा परिषद कुठल्या ना कुठल्या कारणाने नेहमीच चर्चेत असते,गेल्या महिन्यात जिल्हा परिषद सदस्यांच्या केरळ सहल व ग्रामीण विकास यंत्रणेच्या सरस प्रदर्शनातील कारभारावरुन चर्चेत होती.आता मात्र जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागातील प्रकाराने कनिष्ठ कर्मचारी वरिष्ठावर वरचढ ठरल्याच्या चर्चेने भुवया उंचावल्या आहेत.कार्यालयीन आस्थापने-नुसार कार्यालयातील अधिकारी कर्मचारी यांचे बसण्याची जागा निश्चित केली जाते.

मात्र जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागात याला फाट्यावर मारत वरिष्ठ सहाय्यक असलेला कनिष्ठ कर्मचारी शाही थाटात वातानुकुलीत कक्षात बसून काम करत असल्याचे चित्र बघावयास मिळाले.

तर दुसरीकडे कार्यकारी अभियंता यांच्यानंतर जबाबदार अधिकारी असलेले उप अभियंता हे कार्यालयात सर्वात मागे उघड्या कक्षात बसत आहेत.त्यानंतरचे कार्यालयीन जबाबदार असलेले अधिक्षक व लेखापाल हे सुध्दा सुरवातीलाच बसतात मात्र त्यांना सुध्दा कक्ष देण्यात आलेला नाही.

मात्र वरिष्ठ सहायकाला वातानुकुलीत कक्ष देण्यामागे कार्यकारी अभियंता यांची काय विशेष मर्जी आहे,यावर चर्चा सुरु झाल्या असून वरिष्ठ सहाय्यक उप अभियंता,अधिक्षक व लेखापालावर वरचढ ठरल्याचे बोलले जात आहे.

विशेष म्हणजे या तिन्ही अधिकारी वर्गाजवळ जेवढ्या लोकांची गर्दी दिसून येत नाही,त्यापेक्षा कितीतरी अधिक गर्दी वरिष्ठ सहायकाच्या या कक्षात नेहमीच दिसून येत असून या कक्षातूनच विभागाच्या आर्थिक हिशोबाचा डोलारा चालवला जात असल्याची चर्चा दबक्या आवाजात सुरु आहे.

## ४५ हजार रुपये रोख द्या अनब नावापुढे 'डॉ.'लावा

### 'ऑनररी डॉक्टरेट'चा बाजार; घरपोच, समारंभात प्रदान करण्याचे वेगवेगळे दर

**गोंदिया:-** 'डॉ.' ही उपाधी मिळवण्यासाठी पूर्वी वर्षानुवर्षे अभ्यास, संशोधन आणि घाम गाळावा लागत होता; पण आता केवळ अर्ज केला, पैसे मोजले, की ही पदवी तुमच्या नावापुढे झळकू शकते! केवळ ४५ हजार रुपये मोजले, की कोणालाही नावापुढे 'डॉ.'लावण्याची संधी मिळते, ही धक्कादायक बाब पडताळणीत समोर आली. 'ऑनररी डॉक्टरेट'च्या नावाखाली सुरु झालेल्या या नव्या उद्योगामुळे सन्मानाचा अर्थच बदलताना दिसत आहे.




काही खासगी संस्था व तथाकथित आंतरराष्ट्रीय विद्यापीठांच्या नावाखाली सोशल मीडियावर प्रचार व प्रसार केला जात आहे. 'तुमच्या कार्याचा गौरव', 'तुमच्या नावाच्या आधी डॉ. लावा', अशा प्रलोभनाखाली ऑनररी डॉक्टरेट देण्याचे आमिष दाखवले जात आहे. प्रतिनिधीफ्ने संबंधित नंबरवर संपर्क साधून 'ऑनररी डॉक्टरेट'ची इच्छा व्यक्त केली. तेव्हा त्यासाठी वेगवेगळ्या ऑफर देऊन अवघ्या ८ दिवसांत 'ऑनररी डॉक्टरेट' मिळेल, असे सांगण्यात आले. समारंभाला उपस्थित राहिल्यास वेगळा दर, घरपोच प्रमाणपत्र हवे असल्यास वेगळा दर आकारला जात असल्याचे समोर आले.

**'इंटरनॅशनल'च्या नावाखाली उद्योग**

विविध संस्था स्वतःच्या नावात मकाउन्सिलफ, मइंटरनॅशनलफअसा उल्लेख करून मऑनररी डॉक्टरेटफ देण्याचा उद्योग करीत आहेत. १०० पेक्षा अधिक मकॅटेगरीफ्मध्ये हा सन्मान दिला जात असल्याचे सांगण्यात येते.

**वर्षानुवर्षे संशोधन करणाऱ्यांवर अन्याय**

'डॉ.' ही उपाधी केवळ प्रतिष्ठेचा विषय नसून, ती परिश्रम, ज्ञान आणि संशोधनाची ओळख आहे. वर्षानुवर्षे संशोधन करून डॉक्टरेट मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ही बाब अत्यंत चिंताजनक आहे. अशा प्रकारांमुळे खऱ्या अर्थाने मिळवलेल्या पदव्यांची किंमत कमी होत असल्याची भावना शिक्षण क्षेत्रातून व्यक्त होत आहे.

**नियंत्रण आणणे गरजेचे**

'ऑनररी डॉक्टरेट' हा सन्मान फक्त विशेष योगदानासाठी दिला जातो. तो विक्रीसाठी उपलब्ध असणे, ही गंभीर बाब आहे. यावर नियंत्रण आणणे गरजेचे आहे, असे शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञांनी नमूद केले.अशा पदव्या देणाऱ्यांवर कारवाई व्हावी, तसेच नागरिकांनीही अशा ऑफर्सपासून सावध राहावे, असे आवाहन करण्यात आले.

**दिल्लीत समारंभाला उपस्थित राहण्यासाठी ६५ हजार रुपये**

दिल्लीत होणाऱ्या समारंभाला उपस्थित राहून 'ऑनररी डॉक्टरेट' घेतल्यास ६५ हजार रुपये ला-गतील, तर घरपोच 'ऑनररी डॉक्टरेट' घेतल्यास ४५ हजार रुपये लागतील, असे 'ऑनररी डॉक्टरेट' देणाऱ्या एका संस्थेच्या प्रतिनिधीने सांगितले. एका संस्थेशी संपर्क साधल्यानंतर इतर संस्थांचे स्वतःहून फोन येण्यास सुरुवात झाली. भव्य हॉटेल्स, स्टेज, गाउन आणि प्रमाणपत्र देण्याचा सोहळा, यामुळे अनेकांना ते आकर्षित करतात.



## संपादकीय

### ५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल

५३ वर्षांनी मानवाने पुन्हा चंद्राच्या दिशेने पाऊल टाकले. यावेळी "नासा'ची "आर्टेमिस २' ही मोहीम आहे. या मोहिमेद्वारे अंतराळवीर चांद्रप्रदक्षिणा पूर्ण करून पृथ्वीवर परतणार आहेत. १९७२ मधील अपोलो १७ मोहिमेनंतर मानवी अंतराळ प्रवासाच्या इतिहासातील ही सर्वात लांबची आणि महत्त्वाची मोहीम मानली जात आहे.

फ्लोरिडा येथील केनेडी अंतराळ केंद्रातून ङ्कस्पेस लॉन्च सिस्टमफ (एसएलएस) या महाकाय रॉकेटच्या साहाय्याने ओरियन अंतराळयान अंतराळात झेपावले. यात कमांडर रीड वाईजमन यांच्या नेतृत्वाखालील पथकात पायलट व्हिक्टर ग्लोव्हर, मिशन स्पेशालिस्ट क्रिस्टीना कोच आणि कॅनेडियन अंतराळ संस्थेचे जेरेमी हॅन्सन यांचा समावेश आहे. क्रिस्टीना कोच यांच्याकडे आधीच सर्वात लांब एकल अंतराळ प्रवासाच्या विक्रमाची पार्श्वभूमी आहे. या मोहिमेद्वारे त्या चंद्राच्या कक्षेत पोहोचणाऱ्या पहिल्या महिला ठरल्या. हे चारही तज्ज्ञ चंद्राच्या "फार साईड'चे म्हणजेच पृथ्वीवरून कधीही न दिसणाऱ्या भागाचे प्रत्यक्ष निरीक्षण करणार आहेत. ही मोहीम केवळ चांद्रप्रदक्षिणा नाही, तर भविष्यातील मंगळ मोहिमा आणि चंद्रावर कायमस्वरूपी मानवी वस्ती स्थापन करण्याच्या दृष्टीने एक महत्त्वाचा आधार ठरणार आहे. या मोहिमेचा मुख्य उद्देश मानवी अंतराळ प्रवासाच्या मर्यादा तपासणे आणि नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष वातावरणात चाचणी करणे हा आहे. आर्टेमिस-२ ही एक "क्रूड फ्लायबाय' मोहीम आहे.

याचा अर्थ असा की, अंतराळवीर चंद्राच्या पृष्ठभागावरउतरणार नाहीत, तर चंद्राच्या मागच्या बाजूने एक विस्तीर्ण वळण घेऊन पृथ्वीवर परततील. या दहा दिवसांच्या प्रवासात ओरियन यान पृथ्वीपासून सुमारे ३,९३,००० किलोमीटर अंतरापर्यंत मजल मारेल. हे अंतर अपोलो १३ मोहिमेने प्रस्थापित केलेला विक्रम मोडीत काढणारे ठरेल. हे यान पृथ्वीपासून २.३ लाख मैल दूर जाणार आहे. पण याचा खरा उद्देश ओरियन स्पेसक्राफ्टच्या जीवन प्रणालीचा अभ्यास करणे हा आहे. ही मोहीम काढण्यामागे मुख्य कारण आहे ते २००८ मध्ये नासाने चांद्रयान मोहीम काढली होती त्यात चंद्रावर पाणी असल्याचे पुरावे दिले होते. त्याची पडताळणी करण्यासाठी ही मोहीम आखली आहे.

अर्थात यावेळी त्यांच्या मोहिमेचा उद्देश चंद्रावर जाऊन झेंडा उभारण्याचा नाही. तेव्हा अमेरिका आणि रशिया यांच्यात वैज्ञानिक वर्चस्वाची लढाई होती आणि त्यात वर्चस्व कोण राखते यावर प्राणपणाला लावून ती लढाई खेळली जात असे. पण आता तो काळ मागे पडला. रशियाही आता कोसळला आणि अमेरिका जगातील सर्वात बलवान राष्ट्र राहिले नाही. आर्टेमिस हे विज्ञान आणि भू-राजकीय संघर्षात वेगळे युगाचे प्रतिनिधित्व करते. चीन आणि अमेरिकन अंतराळ स्पर्धेत चंद्र हे एकमात्र अग्रगण्य स्थान आहे. त्यासाठीच दोन्ही देशांचा संघर्ष आहे. आर्टेमिस हे जागतिक पवित्र्याबाबत व्यापक अंतराळ संशोधन आहे. या मोहिमेचा उद्देश अधिक व्यापक स्वरूपाचा आहे. चंद्रावर हिम सापडले होते आणि शास्त्रज्ञांचा अंदाज असा आहे, की चंद्रावर खड्डे आहेत आणि या हिमाचा उपयोग स्पेस स्टेशन बांधण्यासाठी करता येऊ शकतो का? तसेच चंद्रावर जीवरक्षक प्रणालीसोबत प्राणवायू आणि हायड्रोजन या वायूंचा उपयोग करून रॉकेट लाँचर्ससाठी त्यांचा उपयोग करता येईल का? पण या मोहिमेने अमेरिकेची या अंतराळ वर्चस्वातील दादागिरी पुन्हा एकदा सिद्ध झाली आहे हे तर कबूल करावेच लागेल.

अमेरिकेची स्पर्धा आता रशियाशी नाही तर चीनशी आहे, हे या निमित्तान सिद्ध झाले. कारण चीन आणि अमेरिका यांच्यातील अंतराळ स्पर्धेला नवा आयाम या आर्टेमिस मोहिमेने दिला आहे. चंद्रीय अवकाशात या मोहिमेने नव्या स्पर्धेला तोंड फुटले आहे आणि अमेरिका आणि चीन यांच्यात तांत्रिक वर्चस्वासाठी जबरदस्त लढाई आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे भू-राजकीय वर्चस्वासाठीही हे युद्ध आहे. या दृष्टीनेच नासाच्या या मोहिमेकडे पाहिले पाहिजे. चंद्राचा दक्षिण ध्रुव हा या स्पर्धेचे मैदान बनला आहे आणि दोन्ही राष्ट्रे संभाव्य पाण्याच्या स्पर्धेसाठी आणि स्त्रोतांसाठी त्यात उतरली आहे. अमेरिकेने या दिशेने सुरुवात केली आहे, तर चीन २०२८-२९ मध्ये चंद्रावर उतरून आपली मोहीम पार पाडणार आहे. आर्टेमिसचे महत्त्व हे आहे, की त्यातून जास्त सुपिरियर मानवी उड्डाण क्षमता कुणाची आहे हे सिद्ध करणार आहे. त्यामुळे अंतराळात आपले प्रथम स्थान निर्माण करून त्यावर राहणे हेच अमेरिकेचे उद्दिष्ट आहे.

अमेरिकेची मोहीम ही युरोप, कॅनडा आणि जपान यांच्या अंतराळ संशोधकांची मिळून बनलेली व्यापक आणि सर्वसमावेशक आहे, तर चीनची स्वतंत्र आहे.अर्थात चीनचा भागीदार रशिया आहे. आर्टेमिस यशस्वी परत आल्याने अमेरिकेचे वर्चस्व सिद्ध झाल्याने चीन या स्पर्धेत काहीसा मागे पडणार आहे. ही अंतराळ स्पर्धा केवळ द्विपक्षीय नाही, तर भारतासारख्या देशांनीही आपली ताकद अंतराळ वर्चस्वात दाखवून दिली आहे.

भारताने चंद्रीय प्रदेशात आपले वर्चस्व दाखवून केवळ हे दोन देशांतील युद्ध नाही, तर बहुदेशीय आहे, हे सिद्ध केले. आर्टेमिस हे अमेरिकेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे कारण अंतराळ संशोधनात अमेरिका यातूनच आपले पुन्हा एकदा महत्त्व प्राप्त करू शकते. चीनच्या प्रगत क्षमतांच्या संदर्भात अमेरिकेला आपली ताकद या मोहिमेद्वारे दाखवून देता येईल. आर्टेमिस ही दहा दिवसांची मोहीम असून त्यातून अमेरिका पुन्हा एकदा आपले चंद्रिय अवकाशात वर्चस्व सिद्ध करेल, तर चीनला त्याची मोहीम आणखी जोरकस करण्यासाठी प्रेरित करेल. अमेरिका आणि चीन यांच्यात आता नव्याने चंद्रासाठी स्पर्धा तयार झाली आहे आणि त्यात वर्चस्व कोण गाजवते यावर अंतराळ स्पर्धेचे भवितव्य ठरणार आहे. १९६१ मध्ये युरी गागारिन हा पहिला अंतराळ वीर ठरला होता. त्यानंतर अमेरिकेची चांद्रमोहीम झाली आणि त्यानंतर आता पुन्हा आर्टिमिस ही मोहीम पार पाडली.

# लोकशाहीप्रेमी अमेरिकन जनता-जगदीश काबरे



ट्रम्प यांनी आपल्या दुसऱ्या कार्यकाळाची सुरुवात 'अमेरिका फर्स्ट'च्या नावाखाली विविध देशांवर आयात कर लादण्यापासून केली. त्यांनी हे धोरण जनतेला मराष्ट्रीय हितफ म्हणून विकले. पण वास्तवात याचा सर्वाधिक फटका कोणाला बसला... तर अमेरिकन नागरिकांनाच! कारण परदेशी उत्पादनांवर कर लादला की त्याचा भार थेट ग्राहकांवर येतो. किराणा सामानापासून ते इलेक्ट्रॉनिक्सपर्यंत, कपड्यांपासून ते गाड्यांपर्यंत सगळ्याच गोष्टी महाग झाल्या. निदर्शनकर्त्यांनी ट्रम्प यांचे इराणशी सुरू असलेले युद्ध, पेट्रोलचे वाढते दर आणि सरकारच्या सामूहिक निर्वासन धोरणाविरोधात आवाज उठवला.

हा 'आर्थिक राष्ट्रवाद' नाही, तर हा आर्थिक मूर्खपणा आहे. जेव्हा अमेरिकेतील एखाद्या व्यक्तीला भाजीपाला विकत घेताना दहा वेळा विचार करावा लागतो, तेव्हा 'अमेरिका फर्स्ट' राहात नाही, तर ते अमेरिकन कुटुंबांना शेवटी टाकणे आहे. ट्रम्प यांचे आर्थिक धोरण म्हणजे श्रीमंत उद्योगपतींना फायदा आणि सामान्य जनतेला महागाईचा सामना अशा प्रकारचे राहिले आहे, हे आता उघड झाले आहे. ट्रम्प यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वात धक्कादायक पैलू म्हणजे ते स्वतःला 'राजा' समजतात. ऑक्टोबर २०२५ च्या निदर्शनांच्या रात्री, ट्रम्प यांनी कृत्रिम बुद्धिमत्तेने तयार केलेला एक व्हिडिओ प्रसारित केला ज्यात ते लढाऊ विमानात 'किंग ट्रम्प' असे लिहिलेल्या मुकुटात दिसत होते आणि निदर्शकांवर तपकिरी द्रव टाकत होते. एका लोकशाही देशाचा निर्वाचित नेता असे वर्तन करतो यापेक्षा मोठा लोकशाहीचा अपमान काय असेल?

ट्रम्प यांनी निवडणूक प्रचारात स्वतःला 'शांतीचा पुरस्कर्ता' म्हणून सादर केले होते. "मी एकही नवीन युद्ध सुरू करणार नाही", हे त्यांचे वचन होते. पण सत्तेत आल्यानंतर इस्राएलशी संगनमत करून त्यांनी इराणशी युद्ध पेटवले. त्यामुळे 'नो किंग्ज, नो वॉर' ही निदर्शने अमेरिकेच्या इराणशी असलेल्या युद्धाविरोधातील नाराजीवर आधारित आहेत, ज्याला 'ऑपरेशन एपिक फ्युरी' असे नाव देण्यात आले आहे. ट्रम्प यांचे टीकाकार त्यांच्या कार्यकारी आदेशांद्वारे राज्य करण्याच्या सवयीवर, इंधन व हवामान नकाराच्या वेडावर आणि शांततेचे आश्वासन देऊन निवडणूक जिंकल्यानंतर लष्करी शक्ती दाखवण्याच्या त्यांच्या वृत्तीवर टीका करू लागले आहेत. हे युद्ध म्हणजे अमेरिकन तरुणांच्या रक्ताने दुसऱ्याच्या भू-राजकीय महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्याचा प्रकार आहे. लंडनमधील निदर्शनांमध्ये "नो किंग्ज, नो वॉर" असे फलक घेऊन लोक रस्त्यावर उतरले होते, तर पॅरिसमधील आयोजक अदा शेन यांनी सांगितले की ते ट्रम्प यांच्या सर्व बेकायदेशीर, अनैतिक, बेजबाबदार आणि अंतहीन युद्धा विरोधात आवाज उठवत आहेत.

ट्रम्प यांचे स्थलांतर धोरण म्हणजे केवळ कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न नाही, तर तो मानवतेचा प्रश्न आहे. मिनेसोटामधील सेंट पॉल हे या आंदोलनाचे राष्ट्रीय केंद्र म्हणून निवडले गेले, कारण फेडरल एजंट्सनी स्थलांतर विरोधी कारवाईवर लक्ष ठेवणाऱ्या दोन नागरिकांना रे नी गुड आणि ॲलेक्स प्रेटी गोळ्या घालून ठार केले होते. या घटनेनंतर ब्रूस स्प्रिंगस्टीन यांनी 'स्ट्रीट्स ऑफ मिनियापोलिस' हे गाणे लिहिले आणि ते सादर करताना ते म्हणाले: "तुमच्या ताकदीने आणि वचनबद्धतेने उर्वरित देशाला हे सांगितले की हे अजूनही अमेरिका आहे." सरकार नागरिकांवरच गोळ्या झाडते, तेव्हा "लॉ अँड ऑर्डर" हा नारा पोकळ वाटतो. ट्रम्प यांच्या सरकारने स्थलांतरितांची शिकार करताना अमेरिकेच्याच नागरिकांचे जीव घेतले, हे अक्षम्य आहे.

जून २०२५ च्या पहिल्या 'नो किंग्ज' आंदोलनात ५० लाखांहून अधिक लोक सहभागी झाले होते आणि ऑक्टोबर २०२५ मध्ये हाच आकडा ७० लाखांच्या जवळ पोहोचला. हे आकडे केवळ संख्या नाहीत, तर हे लोकशाहीच्या ताकदीचे प्रतीक आहे. २८ मार्च २०२६ रोजी सेंट पॉलमध्ये एकट्या एका रॅलीत २ लाखांहून अधिक लोक जमले, जे २०१७ च्या वुमेन्स मार्चपेक्षाही जास्त होते. आयोजकांनी सांगितले की दोन तृतीयांश सहभागी मोठ्या शहरांबाहेरून आले होते, यात इडाहो, व्योमिंग, मोन्टाना, उटाह, साऊथ डकोटा आणि लुईझियाना यांसारख्या पुराणमतवादी राज्यांचाही समावेश होता, हे लक्षात घेण्यासारखे आहे. हे केवळ डेमोक्रॅट्सचे आंदोलन नाही. हे केवळ उदारमतवाद्यांचे आंदोलन नाही. ते पक्ष, जात, धर्म यांच्या पलीकडे जाऊन सगळ्या अमेरिकन नागरिकांनी एकत्र येऊन केलेले आंदोलन आहे. हे आंदोलन फक्त अमेरिकेतच झाले असे नाही तर युरोपीय शहरांमध्येही लंडन, पॅरिस, बर्लिन, माद्रिद आणि रोममध्ये निदर्शने झाली. रोममध्ये तर पोलिस बंदोबस्तात २०,००० लोकांनी मोर्चा काढला. जेव्हा एखाद्या देशाच्या नेत्याच्या धोरणांविरोधात दुसऱ्या खंडातील लोक रस्त्यावर उतरतात, तेव्हा समजावे की ती व्यक्ती केवळ आपल्या देशालाच नाही, तर जागतिक स्थैर्याला धोका निर्माण करत आहे.

या आंदोलनाचे नाव आणि मुख्य भावना ट्रम्प यांच्याच त्या दाव्यातून आली आहे, ज्यात ते स्वतःला 'राजा' म्हणवतात आणि त्यांच्या सरकारने त्यांना राजासारखे चित्रित करणाऱ्या पोस्ट प्रसारित केल्या होत्या. प्रश्न हा आहे की जो माणूस स्वतःला राजा समजतो, त्याला लोकशाहीच्या मर्यादा कशा मान्य असतील? ट्रम्प यांचे समर्थक म्हणतात की निदर्शने म्हणजे 'ट्रम्प डिरेंजमेंट सिंड्रोम थेरपी सेशन्स' आहेत. पण वास्तव हे आहे की ट्रम्प यांचा समर्थन दर ४०% खाली घसरला आहे आणि नोव्हेंबरमध्ये होणाऱ्या निवडणुकांत त्यांच्या रिपब्लिकन पक्षाला दोन्ही सभागृहांवरील नियंत्रण गमावण्याचा धोका आहे.

"मुखवटाधारी गुप्त पोलिस आपल्या समुदायांना दहशतीत टाकत आहेत. एक बेकायदेशीर, विध्वंसक युद्ध आपल्याला धोक्यात टाकत असून आपल्या खर्चात भर घालत आहे. आपल्या वाक्स्वातंत्र्यावर, नागरी हक्कांवर, मतदानाच्या स्वातंत्र्यावर हल्ले होत आहेत." हे 'नो किंग्ज' संघटनेचे उद्गार आहेत. पब्लिक सिटीझन च्या सह-अध्यक्षा लिसा गिलबर्ट यांनी सांगितले, "अमेरिकेत कोणी राजा नसतो असे सांगणे हे वादग्रस्त नाही. हे देशभक्तीपर कृत्य आहे." या शब्दांमध्ये खूप मोठे सत्य आहे. लोकशाही म्हणजे केवळ निवडणुका नाही. लोकशाही म्हणजे सत्तेला जाब विचारण्याचा अधिकार. जेव्हा सरकार निदर्शकांना 'देशद्रोही' म्हणते, जेव्हा ते विरोधकांवर कायदेशीर कारवाई करते, जेव्हा ते स्वतंत्र न्यायव्यवस्थेला वाकवण्याचा प्रयत्न करते तेव्हा रस्त्यावर उतरणे हीच खरी लोकशाही असते. न्यूयॉर्क सिव्हिल लिबर्टीज युनियनच्या कार्यकारी संचालिका डोना लायबरमन यांनी सांगितले, "ट्रम्प आणि त्यांचे समर्थक लोकांना निदर्शने करण्याची भीती वाटावी यासाठी प्रयत्न करत आहेत. पण ते चुकीचे आहेत... साफ चुकीचे."

थोडक्यात काय तर, डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या दुसऱ्या कार्यकाळात हे सिद्ध केले आहे की, ते शिकण्यास तयार नाहीत. पहिल्या कार्यकाळात जे झाले त्यातून धडा घेण्याऐवजी ते आणखी आक्रमक, आणखी हुकूमशाही वृत्तीचे आणि आणखी अविचारी झाले आहेत. पण त्यांना एक गोष्ट उमगली नाहीय की, अमेरिकन जनता अशा हुकूमशाही पुढे निमूटपणे गप्प बसणार नाही. आयात करांमुळे महागाई, इराण युद्धामुळे अस्थिरता, स्थलांतर धोरणामुळे मानवाधिकारांचे उल्लंघन, आणि त्यावर 'राजा' सारख्या थाटात राज्य करण्याची वृत्ती, या सर्वांनी मिळून एक असा नेता उभा केला आहे जो अमेरिकेसाठी नव्हे, तर स्वतःच्या अहंकारासाठी जगतो. पण इतिहास एकच धडा शिकवतो: जेव्हा राजे वाट चुकतात, तेव्हा जनता रस्त्यावर उतरते. आणि हा रस्ता, या निदर्शनांचा... हा "नो किंग्ज"चा रस्ता, हाच लोकशाहीचा खरा मार्ग आहे.

**(लेखक समाजचिंतक आणि वैज्ञानिक दृष्टिकोन प्रसारक आहेत.)**

# निरोगी जीवनशैलीचा स्वीकार करा



**गोंदिया :-** जागतिक आरोग्य दिनाच्या पर्वावर युवकांनी व्यसनमुक्त राहण्याचा संकल्प करावा. संतुलित आहाराचे सेवन व नियमित व्यायाम करून आपले मन प्रसन्न ठेवावे. सर्व नागरिकांनी निरोगी जीवनशैलीचा अंगीकार करावा, असे प्रतिपादन जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. पुरुषोत्तम पटले यांनी केले.

येथील केटीएस जिल्हा सामान्य रुग्णालयात मंगळवारी (दि.७) जागतिक आरोग्य दिनाच्या निमित्ताने आयोजित जनजागृती कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, ताप्ती सेवा समितीचे कालुराम अग्रवाल, संचालिका सुनीता अग्रवाल, निवासी वैद्यकीय अधिकारी बी. डी. जायस्वाल, डॉ. गुरूप्रसाद खोब्रागडे, डॉ. राजेश बेलंबकर, लेखाधिकारी शिवणकर, डॉ. सचिन उइके, वैद्यकीय अधीक्षक डॉ. संजीव नाईक, वैद्यकीय अधिकारी डॉ. सुवर्णा हुबेकर, डॉ. सोनल कोटांगळे, संजय बिसेन, समाज सेवा अधीक्षक राजेश तागडे, मेट्रोन पारधी, आहार समुपदेशिका पिल्लेवान, सुनील नागपुरे, प्रज्ञा कांबळे, समाजसेवा अधीक्षक राजेश तागडे, डॉ. मयंक जायस्वाल, जिल्हा आयुष अधिकारी डॉ. मीना वट्टी, डॉ. सुवर्णा उपाध्याय, सांख्यिकी अधिकारी निशांत बनसोड उपस्थित होते. याप्रसंगी जिल्हा बालरोग तज्ज्ञ डॉ. सचिन उइके यांनी कुपोषणमुक्त गोंदियाचा संकल्प करा, असे आवाहन केले.

कालुराम अग्रवाल यांनी जगता-जगता रक्तदान आणि जाता-जाता नेत्रदान असा बहुमूल्य संदेश दिला. कार्यक्रमाचे निमित्त साधून एनटीइपी कार्यक्रमांतर्गत निक्षय मित्र म्हणून ताप्ती सेवा समितीच्या संचालिका सुनीता अग्रवाल व कालुराम अग्रवाल यांचा सन्मानपत्र आणि ट्रॉफी देऊन डॉ. पटले यंच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक वैद्यकीय समाजसेवा अधीक्षक राजेश तागडे यांनी मांडले.

# चिचगड वनपरिक्षेत्रात 'खसरा'च्या नावाखाली वृक्षतोड जोरात




**गोंदिया :-** एकीकडे सरकार मएक पेड माँ के नामफ मोहीम राबवून वृक्षारोपणावर भर देत आहे तर दुसरीकडे गोंदिया वन विभागाच्या चिचगड वनपरिक्षेत्रांतर्गत कोकोडी, महाका, धमदीटोला आणि चिलाटी परिसरात मखसराफच्या नावाखाली अवैध वृक्षतोड जोमात सुरू आहे. कंत्राटदार आपल्या मनमर्जीने वृक्षतोड करत आहे. याकडे वन विभागाचे दुर्लक्ष झाल्याचा आरोप आहे.

निसर्ग नियमानुसार ज्या झाडांना फुले किंवा फळे लागलेली असतात, त्यांची तोड करणे कायद्याने गुन्हा आहे. अशा झाडांच्या तोडीसाठी कृषी विभागाची रितसर परवानगी अनिवार्य असते. मात्र, चिचगड येथे कायद्याची ऐशीतैशी करण्यात आली आहे. मोहर व कैऱ्यांनी लगडलेली आंब्याची झाडे जमिनीवर लोळवली जात आहेत. ठेकेदारांच्या धोरणामुळे निसर्गप्रेमींमध्ये संतापाची लाट उसळली आहे. या भागात कार्यरत असलेले कंत्राटदार ग्रामीण भागातील गरीब आणि अज्ञानी शेतकऱ्यांची दिशाभूल करत असल्याचा आरोप आहे. कवडीमोल भावात झाडे खरेदी करून प्रत्यक्षात कमी झाडे असताना पंचनाम्यात मात्र फुगवून संख्या दाखवली जात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, प्रत्यक्ष घटनास्थळी न जाता कार्यालयात बसूनच मसोयीफच्े पंचनामे केले जात असल्याचा आरोप स्थानिक ग्रामस्थांनी केला आहे.

# डॉ. गिरीश गांधी यांच्या नेतृत्वातील वि. सा. संघाची कार्यकारिणी जाहीर

## अखित्त भारतीय साहित्य महामंडळावर लखनसिंह कटरे



**नागपूर:-** विदर्भ साहित्य संघाची निवडणूक झाल्यानंतर कोणत्या पदावर कोण विराजमान होणार पाची बिलास उत्सुकता शिगेला पोहोचली असताना डॉ. गिरीश गांधी यांच्या अध्यक्षतेतील वि. सा. संघाची सन २०२६-२०३१ साठीची कार्यकारिणी मंगळवारी जाहीर करण्यात आली.

अध्यक्षांनी जाहीर केल्यानुसार, वि. सा. संघाच्या उपाध्यक्षपदी अरुणा सबाने, बाळ कुळकर्णी व चंद्रकांत लाखे यांची नियुक्ती करण्यात आली असून सरचिटणीसपदी विलास मानेकर तर कोषाध्यक्षपदी माधुरी साकुळकर राहतील. आसावरी तिडके (कार्यालयीन), अजेय गंपावार (अर्थ व विधी), विवेक कवतेकर (शाखा समन्वयक) यांची चिटणीसपदी नियुक्ती करण्यात आली आहे. संमेलन समितीमध्ये आमंत्रक म्हणून डॉ. गजानन नारे तर सह-आमंत्रक इरफान शेख व डॉ. जया कुळकर्णी यांची तर सांस्कृतिक संकुल समितीचे संचालक म्हणून संदीप बारस्कर व सहसंचालक म्हणून अनिल इंदाणे, डॉ. देवेंद्र पुनसे व विजप कर्णेवार यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

ग्रंथालय समितीच्या संचालक स्वाती मोहरीर राहणार असून सांस्कृतिक समितीच्या संचालक शुभदा फडणवीस तर सहसंचालक संदीप बारस्कर, अमर कुळकर्णी, अजेय गंपावार व विष्णु मनोहर हे आहेत. युगवाणीचे संपादक म्हणून डॉ. श्याम धोंड तर परीक्षा समितीचे संचालक म्हणून डॉ. पराग घोंगे काम पाहतील. अखित्त भारतीय साहित्य महामंडळाचे प्रतिनिधी म्हणून लखनसिंह कटरे व शुभदा फडणवीस यांची नावे महामंडळाकडे पाठविण्यात आली आहेत, तसेच, संमेलन निधी मंडळावर अरुणा सबाने व डॉ. शुभा खेकडे पांची प्रतिनिधी म्हणून नावे पाठविण्यात आली आहेत. ही कार्यकारिणी पुढील पाच वर्षासाठी विदर्भ साहित्य संघाचा कार्यभार सांभाळेल, असे वि. सा. संघाचे नवनियुक्त अध्यक्ष डॉ. गिरीश गांधी यांनी कळिवले आहे.

# ग्रामविकास मंत्र्यांनी सरपंचाची अपील फेटाळली

**सालेकसा :-** तालुक्यातील पिपरिया ग्रामपंचायतीत आर्थिक अनियमिततेच्या आरोपांवर मोठा प्रशासकीय निर्णय समोर आला आहे. महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाच्या कलम ३९ (३) अंतर्गत तत्कालीन सरपंच अनिलकुमार तेजलाल सोयाम यांनी ग्रामविकास मंत्री (पंचायत राज विभाग) यांच्याकडे दाखल केलेली अपील फेटाळण्यात आली आहे. या प्रकरणाची सुनावणी २६ मार्च २०२६ रोजी पार पडली.

सविस्तर असे की, वर्ष २०२१-२२ मध्ये "नागरी सुविधा' योजनेअंतर्गत पिपरिया ग्रामपंचायतीत विविध कामांसाठी लाखो रुपयाचे खर्च "ओम बिल्डिंग मटेरियल सप्लायर' या नावावर दाखवण्यात आला होता. मात्र चौकशीत संबंधित कामे प्रत्यक्षात झाली नसल्याचे व साहित्य पुरवठाही झालेला नसल्याचे उघड झाले.

तसेच आरटीजीएसद्वारे २१ लाख ४६ हजार ६०६ रुपयाचा व्यवहारांचे पुरावे समोर आले. ज्यामुळे आर्थिक गैरव्यवहाराच्या आरोपांना अधिक बळ मिळाले. तपासादरम्यान ग्रामपंचायतीतील कामकाजात आवश्यक त्याप्रक्रियेचे पालन न केल्याचे तसेच लेखा नियमांचे उल्लंघन झाल्याचे स्पष्ट झाले. सरपंच अनिल सोयाम यांच्यावर कामकाजावर नियंत्रण व पारदर्शकता राखण्याची जबाबदारी असताना त्यांनी दुर्लक्ष केल्याचे आढळून आले.

उल्लेखनीय असे की, यापूर्वी यापूवा नागपूर विभागाचे अपर आयुक्त यांनी १४ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशातही सरपंचांना दोषी ठरवून कारवाई पदावरून पायउतर केले होते. त्या आदेशाविरोधात दाखल करण्यात आलेली अपील आता फेटाळण्यात आल्याने पूर्वीचा निर्णय कायम ठेवण्यात आला आहे.

# वडेगाव निवासी रेखा भदाडे यांचे निधन



**देवरी:-** तालुक्यातील वडेगाव निवासी सौ रेखा घनश्याम भदाडे यांचे अल्पशा आजाराने नागपूर येथील इस्पितळात ४ एप्रिल रोजी मृत्यू झाला.त्यांच्यावर वडेगाव येथील त्रिवेणी संगम महादेव घाट येथील स्मशानभूमित अंत्यसंस्कार करण्यात आले.त्या बेरार टाईम्सचे सहसपांदक सुरेश भदाडे यांच्या वहिनी होत.

# मुख्यमंत्र्यांच्या पाठबळामुळे ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील पर्यावरणीय पुनरुज्जीवन प्रकल्पाला मिळाली चालना

## वन विभागाचा झिरोधा व "फार्मर्स फॉर फॉरेस्ट्स' यांच्यात सामंजस्य करार



**मुंबई:-** जैवविविधतेने समृद्ध अशा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प परिसरातील जागेचे पर्यावरणीय पुनरुज्जीवन ("रीवाइल्डिंग') प्रकल्प राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या वन विभागाने झिरोधा कंपनी व संवर्धन भागीदार फार्मर्स फॉर फॉरेस्ट या संस्थांबरोबर सामजस्य करार केला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रोत्साहन आणि पाठबळामुळे हा प्रकल्प साकारणार असून दीर्घकालीन पर्यावरण पुनरुज्जीवन आणि हवामान लवचिकतेसाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरणार आहे.

हा उपक्रम संरक्षित अरण्ये, सामुदायिक जमीन, शेती क्षेत्र, गवताळ प्रदेश आणि जलस्त्रोत अशा विविध भूप्रकारांचा एकत्रित विचार करणारा राज्यातील पहिलाच सर्वसमावेशक लँडस्केप पुनर्संचय प्रकल्प ठरणार आहे. प्रत्येक भूप्रकारानुसार शास्त्रीय पद्धतीने आखलेल्या उपाययोजना राबवून परिसंस्थेचे पुनरुज्जीवन, जैवविविधतेत वाढ आणि मानव वन्यजीव सहअस्तित्व मजबूत करण्यावर भर दिला जाणार आहे.

**जैवविविधतेचा महत्त्वाचा केंद्रबिंदू**

चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्प हा महाराष्ट्रातील सर्वात जुना आणि सर्वात मोठा व्याघ्र प्रकल्प मानला जातो. सुमारे १,७२७ चौ.कि.मी. क्षेत्रफळ असलेल्या या प्रकल्पात दक्षिण उष्णकटिबंधीय कोरड्या पानझडी जंगलांचे मुख्य आणि बफर क्षेत्र समाविष्ट आहे. येथे वाघांची संख्या लक्षणीय असून राखीव क्षेत्रात ८० हून अधिक वाघ असल्याचा अंदाज आहे. गेल्या दशकात या परिसरात वाघांची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. वाघांव्यतिरिक्त बिबटे, रानकुत्रे (ढोले), अस्वल, गवा, विविध हरिण प्रजाती, साप (यामध्ये संकटग्रस्त भारतीय अजगर) आणि १९५ हून अधिक पक्षीप्रजाती येथे आढळतात. त्यामुळे मध्य भारतातील जैवविविधतेसाठी हा परिसर अत्यंत महत्त्वाचा मानला जातो.मात्र, वाघसंख्येतील वाढ आणि बफर क्षेत्रातील मानवी वस्ती यामुळे मानव वन्यजीव संघर्षाची समस्या वाढत आहे. तसेच विकासामुळे अधिवास तुकड्यात विभागले जाण्याची समस्या निर्माण होत आहे. त्यामुळे एकात्मिक आणि समुदायाभिमुख पुनर्संचय उपक्रमांची गरज अधोरेखित झाली आहे.

**रीवाइल्डिंग प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

या सामंजस्य करारानुसार पुढील उद्दिष्टे साध्य होणार आहेत :

* राखीव क्षेत्राभोवती ८०० एकरांहून अधिक अधोगती झालेल्या जमिनीचे पुनर्संचय
* पुनर्संचय उपक्रम, सामुदायिक रोपवाटिका आणि पर्यावरणीय देखरेखीद्वारे १५,००० पेक्षा अधिक ग्रामीण रोजगार दिवसांची निर्मिती
* १०० हून अधिक स्थानिक वृक्ष, झुडुपे व गवत प्रजातींची लागवड आणि संवर्धन, ज्यामुळे भक्ष्य प्रजाती व इतर वन्यजीवांना अधिवास उपलब्ध होईल

प्रकल्पाची रचना केवळ पारंपरिक वृक्षलागवडीपुरती मर्यादित नसून परिसंस्थेतील नैसर्गिक प्रक्रिया पुनर्संचयित करणे, अधिवासांची जटिलता वाढविणे आणि विविध भूप्रकारांमध्ये वन्यजीवांना मुक्तपणे वावरण्यास सक्षम करणे, या व्यापक उद्दिष्टांवर आधारित आहे.

हा उपक्रम वन्यजीव, स्थानिक समुदाय आणि हवामान या तिन्ही घटकांना लाभदायी ठरेल. विविध भूप्रकारांमध्ये समन्वित काम केल्यास अधिवास ऱ्हासाची कारणे दूर करता येतील आणि भविष्यासाठी लवचिकता निर्माण करता येईल, असे वन विभागाने म्हटले आहे.

**व्यापक प्रादेशिक संवर्धन प्रयत्नांचा भाग**

हा प्रकल्प पूर्व महाराष्ट्रातील सुरू असलेल्या संवर्धन उपक्रमांना पूरक ठरणार आहे. २०२१ पासून "फार्मर्स फॉर फॉरेस्ट' संस्था सुमारे २ लाख हेक्टर वनक्षेत्र, शेती क्षेत्र आणि सामुदायिक जमिनीवर कार्यरत आहे. जंगल संरक्षण, पुनर्वनीकरण, समुदाय सहभाग, रस्त्यावर नाट्यप्रयोगांद्वारे जनजागृती, अग्नि व्यवस्थापन, ऊर्जा कार्यक्षम चुलींचे वितरण आणि अधिवास सुधारणा अशा विविध माध्यमांतून मानवी-वन्यजीव संघर्ष कमी करण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

नवीन भागीदारीमुळे संस्थात्मक क्षमता आणि तांत्रिक साधनसंपत्ती वाढणार असून ताडोबा परिसरातील पर्यावरण पुनर्संचय प्रयत्नांना नवे बळ मिळणार आहे.

**झिरोधाची दीर्घकालीन पर्यावरण बांधिलकी**

झिरोधा ही कंपनी आपल्या एकूण उत्पन्नाच्या १० टक्के रक्कम सामाजिक आणि पर्यावरणीय उपक्रमांसाठी देत आहे. २०२० मध्ये स्थापन करण्यात आलेल्या रेन मॅटर फाऊंडेशन मार्फत हवामान कृती, परिसंस्था पुनर्संचय, शाश्वत उपजीविका आणि विविध क्षेत्रांतील सहकार्याला याद्वारे चालना देण्यात येत आहे.२०२५ मध्ये १५ व्या वर्धापनदिनानिमित्त झिरोधाने "झिरोधा रिवाईड फंड'ची घोषणा केली असून, देशभरातील अधोगती झालेल्या भूभागाच्या पुनर्संचयासाठी १०० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हा निधी झिरोधामार्फत, रेनमॅटर फाऊंडेशनच्या सहकार्याने राबविला जाणार असून मोठ्या प्रमाणावर रीवाइल्डिंग उपक्रमांना चालना देण्याचा उद्देश आहे. या फंडच्या माध्यमातून ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पात हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# किंडगीपार दारूबंदी आंदोलनाला हिंसक वळण



### ८० ते ९० आंदोलकांवर गुन्हे दाखल

**या प्रकरणी फिर्यादी मनीषा निकम यांच्या तक्रारीवरून मुख्य आरोपी संतोष दोनोडे यांच्यासह सुमारे ८० ते ९० व्यक्तींवर बीएनएस १३२, २२१(१), २२१(२), ३५२, १८९(२), १८९(३), १८९(४), १९०, १९१, १९१(१), १९१(२), १९१(३), ६१ (२), १२६ (२) या कलम ीन्वये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मंगळवारी अटकेतील तीन आंदोलकांना न्यायालयात हजर केले असता, त्यांना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावण्यात आली आहे**

**आमगाव :–** तालुक्यातील किंडगीपार येथील दारू दुकान कायमस्वरूपी बंद करा या आंदोलनाला सोमवारी (दि.६) हिंसक वळण आले. सोमवारी आंदोलकांना अटक करण्यासाठी गेलेल्या पोलिस पथकावर संतप्त जमावाने दगडफेक केली. यात ६ पोलिस अधिकारी आणि ३५ कर्मचारी जखमी झाले, तर ग्रामस्थ जखमी झाले. दरम्यान, अटकेतील आंदोलकांना न्यायालयाने तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली आहे.

किंडगीपार येथील महिला व गावकऱ्यांनी गावातील दारू दुकान बंद करण्याच्या मागणीसाठी गेल्या महिनाभरापासून आंदोलन सुरू केले आहे, पण त्याची प्रशासनाने अद्यापही दखल न घेतल्याने गावकऱ्यांनी १० एप्रिल रोजी रास्ता रोको व रेल्वे रोको आंदोलनाचा इशारा दिला होता. दरम्यान, ५ एप्रिल रोजी संतोष दोनोडे आणि त्यांच्या कुटुंबीयांना प्रतिबंधात्मक कारवाईची (कलम १६८) नोटीस देण्यासाठी गेलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांशी गावकऱ्यांचा वाद झाला. यावेळी आंदोलकांनी १६८ कलमाची नोटीस फाडून फेकली व उपस्थित पोलिसांना धक्काबुक्की करत घराबाहेर हाकलले. शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल करून ६ एप्रिल रोजी संतोष दोनोडे यांच्यासह तिघांना अटक करण्यासाठी पोलिस किंडगीपार येथे गेले होते. तेव्हा संतप्त ग्रामस्थांनी पोलिसांवर दगडफेक सुरू केली.

परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांनी लाठीचार्ज केला, तर गावकऱ्यांच्या दगडफेकीत जयश्री गाठबांधे, सुरेखा अवताडे, श्याम ब्राह्मणकर, मनीषा निकम, प्रवीण डांगे यांच्यासह पोलिस कर्मचारी गंभीर जखमी झाले. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून पोलिस अधीक्षक गोरख भामरे, अपर पोलिस अधीक्षक अभय डोंगरे यांनी घटनास्थळी धाव घेतली. विविध राजकीय नेत्यांच्या उपस्थितीत जमावाला शांततेचे आवाहन करून परिस्थिती नियंत्रणात आणण्यात आली.

# जिल्हा परिषद आरोग्य विभागाने साजरा केला जागतिक आरोग्य दिन



**गोंदिया:–** एप्रिल जागतिक आरोग्य दिन कार्यक्रम जिल्हा परिषद आरोग्य विभाग व राष्ट्रीय आरोग्य अभियान यांच्या एकत्रित सहकार्याने जिल्हा परिषदेच्या दर्शनी भागात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष तथा आरोग्य.शिक्षण व क्रिडा सभापती सुरेशजी हर्षे,अर्थ व बांधकाम सभापती डॉ.लक्ष्मणजी भगत यांचे सह जिल्हा परिषदेचे ईतर सदस्य व ईतर विभागाचे विभाग प्रमुख,अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आजच्या आधुनिक जगात जिथे अनुवांशिक आजार आणि संसर्गजन्य रोगांसोबतच, जीवनशैलीशी संबंधित आजारही लोकांवर मोठ्या प्रमाणावर परिणाम करत आहेत.२०२६ मध्ये ज्याची थीम ङ्गएकत्रित प्रयत्न आरोग्यासाठी, विज्ञानाची साथ भविष्यासाठीङ्ग अशी आहे,आरोग्यासाठी एकत्र व्यक्ती, समाज आणि जगभरातील आरोग्य संस्थांनी मानवी, प्राणी आणि पर्यावरणाच्या आरोग्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे.विज्ञानासोबत राहा उपचार करताना केवळ अफवांवर किंवा घरगुती उपायांवर अवलंबून न राहता वैज्ञानिक माहितीवर विश्वास ठेवा.गैरसमज आणि चुकीची माहिती टाळा सोशल मीडियावर येणाऱ्या चुकीच्या आरोग्यविषयक सल्ल्यांपासून सावध राहा आणि केवळ पडताळणी केलेली माहितीच वापरा.स्वतःहून औषधोपचार टाळा,एआय किंवा इंटरनेटवरून लक्षणे शोधून स्वतःच उपचार करणे टाळा.तज्ज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्या. जीवनशैलीत बदल, निरोगी आहारासह, योग्य वैज्ञानिक दृष्टिकोन ठेवून जीवनशैली सुधारण्यावर या वर्षात भर देण्याचे आवाहन डॉ.गोल्हार यांनी यावेळी केले.

यावेळी जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल यांनी जिल्ह्यात वाढते तापमान बघता उष्माघात टाळण्यासाठीचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेची माहिती यावेळी समुदयाला दिली.यावेळी जिल्हा परिषद येथील मध्यवर्ती ईमारतीत एनसीडी कार्यक्रम अंतर्गत मधुमेह संबधाने ब्लड शुगर व रक्तदाब तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते.जिल्हा परिषद पदाधिकारी,अधिकारी व कर्मचारी यांनी आपली आरोग्याची तपासणीचा लाभ या वेळी घेतला.

थोडक्यात, आरोग्यासाठी शास्त्रीय माहितीचा हात सोडू नका आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनाखाली एकत्रित प्रयत्न करा, हा यावर्षीचा मुख्य संदेश डॉ.गोल्हार यांनी यावेळी दिला.

दि. ७ एप्रिल जागतिक आरोग्य दिन कार्यक्रम वेळी जिल्हा माध्यम व विस्तार अधिकारी विजय आखाडे,जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक अर्चना वानखेडे,सहाय्यक प्रशासन अधिकारी प्रमोद काळे,कनिष्ठ प्रशासन अधिकारी शाम लिचडे,आयईसी विभागाचे प्रशांत खरात,आरोग्य पर्यवेक्षक मिलिंद नंदागवळी व विजय शेंडे, आरोग्य सहाय्यक प्रशांत बंसोड,जिल्हा समन्वयक डॉ.श्रुती राणा,डॉ.तनया चौधरी,कल्याणी चौधरी,मंजु रहांगडाले,मनिशा देशमुख,ज्योती सावरकर,भुमेश्वरी देशमुख,संजय दोनोडे,राजेश दोनोडे,उकदास बिसेन,रविंद्र श्रीवास,प्रमोद मेश्राम ,नितीन पारधी,गुलाब मेश्राम,योगिता हटोलकर,दरवडे ,शहारे,सारनाथ बोरकर,अल्का मिश्रा,मनिषा राऊत यांवेळी कार्यक्रमात उपस्थित होते.

# सभामंडपाचे बांधकाम निकृष्ठ दर्जाचे बोटे येथे ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी

**गोरेगाव:–** तालुक्यातील बोटे या गावात सध्या सभा मंडप बांधकामाच्या कामांवरून विविध प्रश्न उपस्थित होत असून, या कामाबाबत ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. गेल्या काही महिन्यांपासून गावात दोन वेगवेगळ्या ठिकाणी सभामंडपाचे बांधकाम करण्यात आले असून, या दोन्ही कामांच्या दर्जाबाबत तसेच नियोजनाबाबत अनेक शंका उपस्थित केल्या जात आहेत.



गावातील माता मंदिराजवळ लोकप्रतिनिधी स्थानिक विकास निधीतून एक सभा मंडप उभारण्यात आला आहे. या कामासाठी अंदाजे ५ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. मात्र, या बांधकामाच्या गुणवत्तेबाबत ग्रामस्थांकडून समाधान व्यक्त करण्यात आलेले नाही. दुसरीकडे, २५/१५ योजनेअंतर्गत तलावाच्या काठावर आणखी एक सभा मंडप बांधण्याचे काम सुरू करण्यात आले होते. हे कामही सुमारे ५ लाख रुपयांच्या निधीतून सुरू झाले असले तरी, गेल्या एक वर्षापासून ते अपूर्ण अवस्थेतच पडून आहे. विशेष म्हणजे, गावातील बहुतांश विकासकामे स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या माध्यमातून केली जात असल्याची चर्चा असून, या कामांमध्ये योग्य नियोजनाचा अभाव असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे. यामुळे निधीचा अपव्यय होत असल्याचीही भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे. २५/१५ योजनेअंतर्गत सुरू असलेल्या सभा मंडपाच्या बांधकामाबाबत ग्रामस्थांनी गंभीर आक्षेप नोंदवले आहेत. हे काम जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या देखरेखीखाली सुरू असले तरी प्रत्यक्षात कामाची गुणवत्ता अत्यंत निकृष्ट असल्याचे

दिसून येत आहे. बांधकामाच्या एका बाजूचा लिंटर बीम वाकलेला असून, ही बाब अत्यंत गंभीर आहे. तसेच, बांधकामासाठी आवश्यक असलेली पाण्याची क्युरिंग प्रक्रिया योग्य प्रकारे करण्यात आलेली नाही, ज्यामुळे बांधकामाच्या टिकाऊपणावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या बांधकामाची उच्च स्तरावर चौकशी करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

**बोटे येथे दोन सभा मंडप मंजूर करण्यात असून, दुसरे काम निधीअभावी अपूर्ण राहिले आहे. संबंधित ठेकेदाराला उर्वरित काम तातडीने पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.**
**– महेंद्र खोब्रागडे, अभियंता, बांधकाम विभाग,जि.प., गोंदिया**

# परवानगीशिवाय न.प.लेखापालाकडून २० कोटींची रक्कम खासगी बँकेत जमा

**गोंदिया :–** स्थानिक नगर परिषदेतील गेल्या चार वर्षातील अनागोंदी कारभार उघडकीस येत आहे. नगर परिषदेच्या लेखापालाने कर्मचाऱ्यांच्या डीसीपीएस व जीपीएफची कपात केलेली रक्कम राष्ट्रीयीकृत बँकेत जमा करण्याचे निर्देश असताना त्याला डावलून लेखापालाने तब्बल २० कोटी रुपयांची रक्कम दोन खासगी बँकांमध्ये जमा केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे.

यप्रकरणाची चौकशी करून लेखापालावर निलंबनाची कारवाई करण्याची मागणी काँग्रेस पक्षाने केली आहे. प्राप्त माहितीनुसार नगर परिषद कर्मचाऱ्यांच्या पगारातून कपात केलेली रक्कम डीसीपीएस व जीपीएफ योजनांत जमा केली जाते. ज्यात शासनाच्या रकमेची भर घालत फरकेनुसार रक्कम दिली




जाती.

शासकीय निर्देशानुसार ही रक्कम फक्त राष्ट्रीयीकृत बँकांमध्ये जमा करण्याचा नियम आहे; पण येथील लेखापाल मेश्राम यांनी १५ कोटी नागपूर येथील आयडीएफसी बँकेत व ५ कोटी गोंदिया येथील एयू बँकेत जमा केली. यासाठी शासनाची परवानगी न घेता हा प्रकार केल्याचे उघडकीस आले आहे. विशेष म्हणजे लेखापाल मेश्राम पूर्वी हिंगणघाट नगर परिषदेत कार्यरत होते. तिथेही त्यांनी बँक खाती आयडीएफसी या खासगी नागपूर येथे उघडली होती. गोंदिया नगर परिषदेत रुजू झाल्यानंतरही तेच धोरण कायम ठेवले आहे. लेखापालाने खासगी बँक अधिकाऱ्यांसह साटेलोटे करून हा प्रकार केल्याचा आरोप काँग्रेसच्या पदाधिकार्यांनी केला आहे.

**लेखापालाला त्वरित निलंबित करा**

शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अशोक चौधरी, महासचिव मनोज पटनायक, पुरणलाल पाठोडे व इतरांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, नगराध्यक्ष सचिन शेंडे व जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहून लेखापाल मेश्राम यांच्यावर त्वरित निलंबनाची कारवाई करण्याची मागणी केली आहे व दोषींवर कारवाईची मागणी केली आहे. न.प. मधील अनियमिततेवर पूर्णपणे उपाययोजना व्हाव्यात, अशी अपेक्षा आहे.

# २१ एप्रिलपासून राज्य सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर

**गोंदिया :–** जुनी पेन्शन योजना लागू करा, सेवानिवृत्तीचे वय ६० करा, यासह विविध मागण्यांसाठी सरकारी–निमसरकारी, शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचारी समन्वय समितीने २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

सुधारित राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजनेची अंमलबजावणी करण्याबाबतची विस्तृत अधिसूचना तत्काळ जारी करण्यात यावी. सरकारी कर्मचारी, निमसरकारी कर्मचारी, तसेच शिक्षण विभागातील शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवांतर्गत समस्यांवर मुख्यमंत्रीस्तरावर चर्चा करून निर्णय घेण्यासाठी, दोन महिन्यांतून एकदा चर्चासत्राचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्यात यावे. १ नोव्हेंबर २००५ पूर्वी विनाअनुदान, अंशतः अनुदानावर नियुक्त, तसेच २००५ नंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शिक्षक–शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना, तसेच वसतिशाळा शिक्षकांना जुनी पेन्शन योजना लागू करा. चतुर्थश्रेणी कर्मचारी आणि वाहन चालक भरतीवरील बंदी तत्काळ उठवा. १०:२०:३० वर्षाच्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ शिक्षक–शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना लागू करण्यात यावा.

राज्यातील नगरपरिषदा आणि नगरपंचायतीचा सन २००५ पासूनचा आकृतीबंध तयार करण्यात यावा, तसेच पूर्वाश्रमीच्या ग्रामपंचायतीमधील कायम असलेल्या कर्मचाऱ्यांचे नियमित समावेशन करण्यात यावे. सर्व सरकारी कर्मचारी, निवृत्तीवेतनधारक, कंत्राटी रोजंदारी कर्मचारी यांना सर्व महत्त्वाच्या इस्पितळात कॅशलेस उपचार मिळावेत, यासाठी व्यापक स्वास्थ्य विमा योजना लागू करावी. सेवानिवृत्तीचे वय ६० करा. १० वर्षे सतत काम करीत असलेल्या सर्व कंत्राटी, रोजंदारी, अंशकालीन कर्मचाऱ्यांच्या सेवा नियमित करा. एक वेळची बाब म्हणून प्रतीक्षा यादीतील सर्व पात्र उमेदवारांना अनुकंपा तत्त्वावरील नियुक्त्या द्या आदी मागण्यांचा समावेश आहे.

# डॉ. जी. एल. तिरपुडे यांची बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा पुरस्कारासाठी निवड

**गोंदिया:–** स्थानिक जिल्ह्यातील रहिवासी, ज्येष्ठ लेखापाल आणि डॉ. आंबेडकर सर्व जयंती समितीचे माजी अध्यक्ष गेंदालाल लक्ष्मण तिरपुडे यांची ममहामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर राष्ट्रीय विचार प्रेरणा २०२६फसाठी निवड झाली आहे.

हा पुरस्कार ११ एप्रिल २०२६ रोजी कोल्हापूर येथील राजश्री शाहू महाराज दसरा मैदानावर, महाराष्ट्र राज्याचे माजी गृह राज्यमंत्री, आमदार सतेज उर्फ बंटी पाटील, माजी महापौर कृपाल शेटे, साहित्यिक आणि चित्रकार मिलिंद यादव, डॉ. वसंत भागवत कवी, प्रकाशक आणि दिग्दर्शक अनिल माने इत्यादी मान्यवरांच्या हस्ते प्रदान केला जाईल. पुरस्कारासाठी निवड झाल्याबद्दल मित्र आणि कुटुंबीयांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.


## ग्रामपंचायत कार्यालय चीरचाळबांध

**निविदा सुचना–०१/२०२६–२** दि.०७/०४/२०२६

ग्रामपंचायत कार्यालय चीरचाळबांध (कुणबीटोला) पंचायत समिती आमगाव जिल्हा परिषद गोंदिया हे योजना **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत** सार्वजनिक शौचालय (CSO) बांधकाम, निविदा यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून द्वी–लिफाफा शेकडावारी ऑफलाईन पद्धतीने मागवित येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना ग्रा.पं.च्या नोटीसबोर्डवर दिनांक ०७/०४/२०२६ पासून उपलब्ध आहे.

| अ. क्र. | योजनेचे व कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम १% | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा किंमत नापरतावा) | कंत्राटदार नोंदणीचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ योजना अंतर्गत जि.प.शाळा कुणबीटोला येथे सार्वजनिक शौचालय (CSO) बांधकाम, करणे | ३०००००/– | ३०००/– | ३ महिने | ५००/– | यथायोग्य |
| | **एकुण** | ३०००००/– | ३०००/– | | ५००/– | |

**कामाचे विवरण**
(विस्तृत अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या नोटिस बोर्डावर बघायला मिळेल.)

**ई–निविदा पद्धतीचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | ०७/०४/२०२६ पासून |
| २ | निविदा दाखल करण्याची सुरुवातीची दिनांक | ०७/०४/२०२६ पासून |
| ३ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | १४/०४/२०२६ संध्या.५.०० |
| ४ | ऑफ़लाईन निविदा उघडने | सरपंच/सचिव,ग्रामपंचायत चीरचाळबांध यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दि.१५/०४/२०२६ स.१२.०० वाजता लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय चीरचाळबांध

**सरपंच**
ग्रामपंचायत कार्यालय चीरचाळबांध


# मोहाडी येथे पाणीपुरवठा योजनेचा सभापती डॉ.भगत यांच्या हस्ते शुभारंभ



**गोरेगाव:–** तालुक्यातील मोहाडी येथे केंद्र शासनाच्या महत्त्वाकांक्षी जलजीवन मिशन अंतर्गत राबविण्यात आलेल्या पाणीपुरवठा योजनेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात जिल्हा परिषद अर्थ व बांधकाम सभापती डॉ. लक्ष्मण भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या योजनेमुळे गावातील नागरिकांना दीर्घकाळ भेडसावत असलेल्या पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर मोठ्या प्रमाणात मात होणार असून, प्रत्येक घरापर्यंत शुद्ध आणि नियमित पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.कार्यक्रमास पंचायत समिती गोरेगावचे उपसभापती रामेश्वर महारवाडे, सरपंच नरेंद्र चौरागडे, उपसरपंच वाकले, ग्रामपंचायत सदस्य तसेच स्थानिक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमादरम्यान मान्यवरांनी जलजीवन मिशनच्या उद्दिष्टांवर प्रकाश टाकताना सांगितले की, ग्रामीण भागातील प्रत्येक घरापर्यंत नळाद्वारे शुद्ध पिण्याचे पाणी पोहोचवणे हे या योजनेचे मुख्य ध्येय आहे. यामुळे महिलांवरील पाण्याच्या टंचाईमुळे होणारा ताण कमी होणार असून, आरोग्यदायी जीवनशैलीला चालना मिळणार आहे. तसेच दूषित पाण्यामुळे होणाऱ्या आजारांवरही मोठ्या प्रमाणात नियंत्रण मिळवता येणार आहे. डॉ. भगत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, जलजीवन मिशन ही केवळ पाणीपुरवठा योजना नसून ग्रामीण विकासाचा पाया मजबूत करणारी एक क्रांतिकारी योजना आहे.

शासनाच्या माध्यमातून ग्रामीण भागात मूलभूत सुविधा पोहोचवण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. या योजनेचा योग्य वापर करून गावकऱ्यांनी पाण्याचे जतन करणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. यावेळी इतर मान्यवरांनीही आपले मनोगत व्यक्त करत नागरिकांना पाण्याचा अपव्यय टाळण्याचे आवाहन केले.

# काचेवाणी येथील रेल्वे उड्डाण पुलाचे काम लवकरच



**तिरोडा:–** तिरोडा–गोंदिया मार्गावरील काचेवाणी येथील रेल्वे ओव्हरब्रिजचे काम मंजूर झालेले असतानाही काही तांत्रिक अडचणींमुळे सदर काम प्रलंबित आहे. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय महामार्ग विभाग, नागपूर येथील कार्यकारी अभियंता संजीव जगताप यांची आ. विजय रहांगडाले यांनी भेट घेऊन या विषयावर सविस्तर चर्चा केली.

यावेळी काचेवाणी रेल्वे ओव्हरब्रिजच्या कामास गती देऊन तातडीने अडचणी दूर करून काम मार्गी लावण्याबाबत स्पष्ट सूचना देण्यात आल्या. नागरिकांच्या दैनंदिन प्रवासासाठी हा ओव्हरब्रिज अत्यंत महत्त्वाचा असल्याने कामात विलंब होऊ नये, यासाठी आवश्यक ती सर्व प्रशासकीय व तांत्रिक कार्यवाही त्वरित पूर्ण करण्यावर भर देण्यात आला. तसेच अदानी गेट क्रमांक १ ते मुंडीपार या रस्त्याच्या कामाचा आढावाही घेण्यात आला. या रस्त्याच्या दुरुस्ती व सुधारणा कामांना गती देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देण्यात आले.


## ग्रामपंचायत कार्यालय बासिपार

**निविदा सुचना–०१/२०२६–२** दि.०७/०४/२०२६

ग्रामपंचायत कार्यालय बासिपार पंचायत समिती आमगाव जिल्हा परिषद गोंदिया हे योजना **स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ अंतर्गत** सार्वजनिक शौचालय (CSO) बांधकाम, निविदा यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून द्वी–लिफाफा शेकडावारी ऑफलाईन पद्धतीने मागवित येत आहे. निविदेचा विस्तृत नमुना ग्रा.पं.च्या नोटीसबोर्डवर दिनांक ०७/०४/२०२६ पासून उपलब्ध आहे.

| अ. क्र. | योजनेचे व कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम | इसारा रक्कम १% | काम करण्याचा कालावधी | कोरी निविदा किंमत नापरतावा) | कंत्राटदार नोंदणीचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | स्वच्छ भारत मिशन ग्रामीण टप्पा २ योजना अंतर्गत सार्वजनिक परिसर येथे सार्वजनिक शौचालय (CSO) बांधकाम, करणे | ३०००००/– | ३०००/– | ३ महिने | ५००/– | यथायोग्य |
| | **एकुण** | ३०००००/– | ३०००/– | | ५००/– | |

**कामाचे विवरण**
(विस्तृत अंदाजपत्रक ग्रामपंचायतीच्या नोटिस बोर्डावर बघायला मिळेल.)

**ई–निविदा पद्धतीचा तपशिल**

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रसिद्धी | ०७/०४/२०२६ पासून |
| २ | निविदा दाखल करण्याची सुरुवातीची दिनांक | ०७/०४/२०२६ पासून |
| ३ | निविदा दाखल करण्याची अंतिम दिनांक | १४/०४/२०२६ संध्या.५.०० |
| ४ | ऑफ़लाईन निविदा उघडने | सरपंच/सचिव,ग्रामपंचायत बासिपार यांचे कक्षात संबंधित निविदाधारकांचे समक्ष दि.१५/०४/२०२६ स.१२.०० वाजता लिफाफा क्र.१ उघडण्यात येईल. (शक्य झाल्यास) |

**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्रामपंचायत कार्यालय बासिपार

**सरपंच**
ग्रामपंचायत कार्यालय बासिपार


# ढ–२७ वाघिणीचा शोध,वनविभागाची ७० लाईव्ह कॅमेऱ्यांतून युद्धपातळीवर मोहीम



**भंडारा:–** वन विकास महामंडळाच्या विभागीय कार्यालय भंडारा अंतर्गत येणाऱ्या कक्ष क्रमांक १४३ मध्ये १९ मार्च रोजी ढ–२७ या वाघिणीने हल्ला करून वसंत मेश्रामला ठार केले,तर २८ मार्च २०२६ रोजी माया सोनवणे यांच्यावर वाघिणीने हल्ला केल्याने गंभीर दुखापत होऊन उपचारादरम्यान मृत्यू पावल्या.या घटनेनंतर परत १ एप्रिल रोजी वाघिणीने पुन्हा श्रीमती छाया मुंगमडे या महिलेवर हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केल्याची घटना घडल्याने मानव वन्यजीव संघर्षाची परिस्थिती लक्षात घेत व्याघ्र प्रकल्प विभागाच्यावतीने वाघिणीचा शोध सुरु करण्यात आलेला आहे.सोबतच जंगलालगतच्या गावात जनजागृती मोहीम हाती घेण्यात आली आहे.

सदर वाघिणीला जेरबंद करण्यासाठी नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पाचे वन्यजीव बचाव पथक, गोंदिया वन विभागाचे वन्यप्राणी बचाव पथक तसेच भंडारा वन विभागाचे पथक तैनात करण्यात आले आहे.वाघिणीच्या वावराच्या ठिकाणी तसेच संभाव्य प्रवेश मार्गांवर व वावर क्षेत्रात मचान व आमिष (बेट) तयार करण्यात आले असून वाघिणीला बेशुद्ध करण्यासाठी आवश्यक साधनसामग्रीसह चार प्रशिक्षित शार्प शूटर तैनात करण्यात आल्याची माहिती पत्रकाद्वारे व्याघ्र प्रकल्पाच्यावतीने देण्यात आली आहे.

तसेच वाघिणीच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी ५० हून अधिक कॅमेरा ट्रॅप व १० लाईव्ह कॅमेऱ्यांशिवाय, चार थर्मल ड्रोनच्या सहाय्याने जंगल परिसरात दिवस–रात्र शोध मोहीम राबविण्यात येत आहे.वाघिणीचे दररोज चे असित्व/वावर क्षेत्राची माहिती ची वनविभागास मिळत असून वन विभागामार्फत वाघिणीला जेरबंद करण्याचे प्रयत्न अधिक तीव्र करण्यात आले असून लवकरच संबंधित वाघिणीला जेरबंद करण्यात येईल, असा विश्वास नवेगाव–नागझिरा राष्ट्रीय व्याघ्र प्रकल्प प्रशासनाने व्यक्त केला असून स्थानिक नागरिकांनी वनविभागास सदर वाघिणीचे जेरबंद करण्याच्या अनुषंगाने प्रशासनास सहकार्य करावे, असे जाहीर आव्हान करण्यात येत आहे


## ग्रामपंचायत कार्यालय पांढराबोडी
**ता-गोंदिया, जिल्हा गोंदिया**

## जाहिर निविदा
जा.कं. १/२०२६ जाहिरात

सर्व साहित्य पुरवठा धारकांना सुचित करण्यात येते की, ग्राम पंचायत कार्यालय पांढराबोडी येथे सामान्य निधी, पाणी पुरवठा निधी, एम. जी. नरेगा, १५ वा वित्त आयोग व शासनाच्या विविध योजनेअंतर्गत सन २०२६–२७ या आर्थिक वर्षाकरीता खालील प्रमाणे साहित्य लागणार आहेत. खालिल विवरणाप्रमाणे साहित्याची निविदा/दरपत्रक मागविण्यात येत आहे.

| अ.क. | साहित्याचे नाव | दर या प्रमाणात सादर करावे |
|---|---|---|
| १ | बांधकाम साहित्य<br>सिमेंट, रेती, लोहा ६,८,१०,१२एम.एम,<br>विटा, गिटा ८०,४० एम.एम., बजरी २०एम.एम.,<br>रोलर, टेंकर, इतर सर्व बांधकाम साहित्य, ग्रील,<br>सिमेंट चौकट, स्टिल चौकट | प्रती बॅग, ब्रास, नग, क्विंटल या प्रमाणे |
| २ | ब्लेचिंग पावडर, | प्रतिबॅग |
| | फिनाईल | प्रतिलिटर |
| ३ | सिमेंट पाईप, कॉलर ३००,४५०,६००ग | प्रतिनग |
| ४ | विद्यूत साहित्य LED २३ वॉट, वायर १ा, होल्डर,इ..<br>डॅक्स, बॅच, दरी, छोटी प्लास्टिक चेअर, इत्यादी. | प्रतिनग<br>प्रतिनग |
| ५ | हातपंप साहित्य GI पाईप, रॉड, एक्सल, चैन,<br>बेरिंग, अप्पर लोवर वाल,वायसर, हॅन्डल, हातपंप बंडी इत्यादी | **प्रतिनग** |

**अटि व शर्ती:–** १. सदर साहित्याची निविदा ग्राम पंचायत कार्यालय पांढराबोडी येथे दिनांक ०९/०४/२०२६ सायं ५:०० वाजे पर्यंत पोहचते करावे. नंतर आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही. २. निविदा उघडण्याचा दिनांक शक्य झाल्यास १०/०४/२०२६ सकाळी ११:०० वाजता. ३. मंजूर निविदा दिनांक ०४/०४/२०२६ पासून ते ३१/०३/२०२७ पर्यंत वैद्य राहिल. ४. सदर बिल टॅक्स GST रहित बिल स्विकारले जातील. ५. बांधकाम साहित्य जागेवर पोहचता करावे लागेल. ६. कोणत्याही कामाचे अग्रिम रक्कम मिळणार नाही. ७. कोणतेही एक साहित्य आर्थिक वर्षात १ लक्ष किंमतीचे वर गेल्यास ई निविदा मागविण्यात येईल. ८. बांधकाम साहित्य पुरवठा करतेवेळी गौण खनीज रॉयल्टी जोडने आवश्यक आहे. रॉयल्टी न जोडल्यास शासन दराप्रमाणे रक्कम कपात करण्यात येईल. ९. कोणतेही कारण न दर्शविता मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार सचिव/सरपंच यांच्याकडे राखून ठेवण्यात आलेले आहे.

**ग्रामपंचायत अधिकारी**
ग्राम पंचायत पांढराबोडी

**सरपंच**
ग्राम पंचायत पांढराबोडी

# मएनएनटीआर मध्ये कोअर व बफर क्षेत्राचे नियंत्रण आता एकाच छताखाली




**गोंदिया: –** नवेगाव–नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्रात प्रशासकीय सुसूत्रता आणण्यासाठी महाराष्ट्र शासनाने मएकसंघ नियंत्रणफ प्रणाली लागू केली आहे. या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी बुधवारपासून सुरू झाली असून, या अंतर्गत येणाऱ्या १२ वनपरिक्षेत्र कार्यालयांचे उद्घाटन क्षेत्र संचालक पीयूषा जगताप यांच्या हस्ते करण्यात आले. नवेगाव नागझिरा हा राज्यातील ६ प्रमुख व्याघ्र प्रकल्पांपैकी एक असून, याचा विस्तार भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात आहे. २०१७ मध्ये या प्रकल्पाचे बफर क्षेत्र जाहीर झाले होते. मात्र, आजवर या क्षेत्राचे व्यवस्थापन प्रादेशिक वनविभाग (गोंदिया ४१९.८९४ चौ.किमी व भंडारा ६८.५६६ चौ. किमी) आणि एफडीसीएम (१३९.५१४ चौ. किमी) अशा वेगवेगळ्या विभागाकडे होते. या विखुरलेल्या व्यवस्थापनामुळे प्रशासकीय अडचणी येत होत्या. आता शासन निर्णयानुसार सर्व बफर क्षेत्राचे नियंत्रण व्याघ्र प्रकल्पाच्या छत्राखाली आले आहे.

बफर भागातील मानव–वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी, स्थानिक नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी, बफर क्षेत्रातील नागरिकांना रोजगाराच्या संधी वाढविण्यासाठी, नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदिया अंतर्गत प्रशासकीय सुसूत्रता आणण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल उचलण्यात आले आहे.वनपरिक्षेत्र उमरझरी, तिरोडा, सडक/अर्जुनी, नागझिरा, देवरी, पिटेझरी, कोका, गडेगाव,डोंगरगाव, झांशीनगर, बोन्डे, नवेगाव पार्क येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात मकोअरफ आणि मबफरफ क्षेत्राचे एकत्रीकरण करून नव्याने तयार करण्यात आलेले मएकसंघ नियंत्रणफ कार्यालय १ एप्रिलपासून सुरू करण्यात आले.नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्राचे क्षेत्र संचालक तथा उपवनसंरक्षक पीयूषा जगताप यांच्या हस्ते या नूतन कार्यालयाचे फीत कापून उद्घाटन करण्यात आले.

व्याघ्र प्रकल्पाचे व्यवस्थापन अधिक प्रभावी व्हावे व कोअर व बफर क्षेत्रातील समन्वयातील त्रुटी दूर व्हाव्यात, या उद्देशाने हे कार्यालय कार्यान्वित करण्यात आले आहे.

यावेळी गोंदिया वनविभागाचे उपवनसंरक्षक पवन जोंग,नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र गोंदियाचे उपसंचालक प्रितमसिंग कोडापे, नवेगाव नागझिरा व्याघ्र राखीव क्षेत्र नवेगावचे विभागीय वनअधिकारी अतुल देवकर,सामाजिक वनिकरण विभागाचे विभागीय वनअधिकारी तुषार ढमढेरे,सहायक वनसंरक्षक दुर्गे, रिझवी आणि वाघ सर्व सहायक वनसंरक्षक, सर्व वनपरिक्षेत्र अधिकारी व सर्व कर्मचारी वर्ग कार्यक्रमा प्रसंगी उपस्थित होते. एकीकडे प्रशासनाने मएकसंघ नियंत्रणाफसाठी ही पावले उचलली असली, तरी स्थानिक स्तरावर बफर झोनच्या अंमलबजावणीवरून सध्या संतापाचे वातावरण आहे.नवीन कार्यालयामुळे वन्यजीव व्यवस्थापन सुलभ होणार असले, तरी वाढता मानव–वन्यजीव संघर्ष रोखणे आणि ग्रामस्थांच्या मनिस्तारफ हक्कांचे रक्षण करणे, हे या नूतन कार्यालयापुढील सर्वांत मोठे आव्हान असणार आहे.

### बदललेले स्वरूप आणि उद्दिष्टे

**वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांच्या २७ मार्च २०२६ च्या आदे–शानुसार, विविध वनपरिक्षेत्रांच्या कार्यक्षेत्रात आणि मुख्यालयात बदल करण्यात आले आहेत. या नवीन प्रणालीमुळे खालील उद्दिष्टे साध्य होणार आहेतः मानव–वन्यजीव संघर्षः व्याघ्र प्रकल्पाच्या थेट नियंत्रणामुळे वन्यप्राण्यांचा शिरकाव आणि मानवी वस्तीतील संघर्ष कमी करण्यास मदत होईल.**

### रोजगार संधी

**बफर क्षेत्रातील स्थानिक नागरिकांसाठी पर्यटनाच्या माध्यमातून रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होतील. नागरिकांच्या प्रलंबित समस्यांचे तातडीने निराकरण करणे शक्य होईल. नवीन रचनेनुसार उमरझरी, तिरोडा, सडक/अर्जुनी, नागझिरा, देवरी, पिटेझरी, कोका, गडेगाव, नवेगाव पार्क, डोंगरगाव, झांशीनगर आणि बोन्डे या वनपरिक्षेत्र कार्यालयाचे वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांना नेमून दिलेल्या मुख्यालयात उद्घाटन करण्यात आले.**

# गडचिरोलीत जमीन संपादन शेतकरीहित जपूनच; जबरदस्ती नाही–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## योग्य मोबदला व पुनर्वसनाची हमी; मध्यम मार्ग काढण्याचे आवाहन

**नागपूर :–** गडचिरोली जिल्ह्यातील चामोर्शी तालुक्यात प्रस्तावित उद्योगासाठी जमीन संपादन करताना शेतकऱ्यांचे हित अबाधित ठेवले जाईल. कोणत्याही परिस्थितीत जबरदस्ती केली जाणार नाही आणि संबंधित शेतकऱ्यांना जास्तीत जास्त योग्य मोबदला देण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.



रामगिरी येथे आज गडचिरोलीचे आमदार डॉ. मिलिंद नरोटे यांच्या नेतृत्वाखाली चामोर्शी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्र्यांची भेट घेतली. यावेळी सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांच्यासह संबंधित पदाधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, गडचिरोली जिल्हा औद्योगिक विकासाच्या दिशेने वेगाने वाटचाल करत असून ङ्कलोह व पोलाद हबफ म्हणून उदयास येत आहे. या पार्श्वभूमीवर उद्यो‍ग उभारणीसाठी जमीन संपादन आवश्यक असले तरी शासनाचा उद्देश शेतकऱ्यांवर कोणत्याही प्रकारची सक्ती करण्याचा नाही. सर्व संबंधित घटकांशी सविस्तर चर्चा करून सामंजस्याने मध्यम मार्ग काढत जमीन संपादनाची प्रक्रिया राबविण्यात येईल, असे ते म्हणाले.

उद्योगांच्या माध्यमातून स्थानिक भूमिपुत्रांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण होतील, यावर भर देत त्यांनी सांगितले की, जमिनी देणाऱ्या शेतकऱ्यांना न्याय्य मोबदल्यासोबतच पुनर्वसनाचीही योग्य व्यवस्था केली जाईल. विकास प्रक्रियेत सर्वांना सहभागी करून घेण्याचा शासनाचा प्रयत्न असून, शेतकऱ्यांनीही सकारात्मक भूमिका घेऊन सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

कोणाचीही जमीन बळजबरीने घेण्याचा शासनाचा कोणताही मानस नसून स्वेच्छेने जमीन देणाऱ्या शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्याचा प्रयत्न राहील. तसेच स्थानिक युवकांना रोजगार उप–लब्ध करून देण्यासाठी आवश्यक ती पावले उचलली जातील, असेही मुख्यमंत्री यांनी स्पष्ट केले.

# बाई गंगाबाई रुग्णालयात मातेचा मृत्यू

**गोंदिया:–** ताप, बी. पी. आणि पोटात दुखणे अशी लक्षणे असलेल्या सडक अर्जुनी तालुक्यातील राजगुडा येथील एका मातेला २८ मार्च रोजी येथील बाई गंगाबाई महिला रुग्णालयात भरती करण्यात आले होते. परंतु, या मातेचा २९ मार्च रोजी मृत्यू झाला. अवघ्या १६ दिवसांपूर्वीच गोंडस बाळाला जन्माला घातलेल्या या मातेने अचानक जगाचा निरोप घेतल्याने गाव परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. सोबतच शासनाच्या जननी सुरक्षा योजने–वरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.




सडक अर्जुनी तालुक्याच्या राजगुडा येथील पौर्णिमा योगेश मस्के (२२) हिला प्रसुतीकळा सुरू झाल्याने तिच्या कुटुंबीयांनी तिला १६ दिवसांपूर्वी येथील बाई गंगाबाई महिला रुग्णालयात भरती केले होते. तिची नार्मल प्रसुती झाल्याने तिला दुसऱ्या दिवशी सुटी देण्यात आली.

पररंतु, मध्यंतरी तिला ताप, बी. पी. आणि पोटात दुखणे अशी लक्षणे सुरू झाली. त्यामुळे तिला २८ मार्च रोजी सडक अर्जुनी येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, प्रकृती अधिक गंभीर असल्याने तिला येथील बाई गंगाबाई महिला रुग्णालयात हलविण्यात आले. तिथे तिच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. परंतु, ताप कमी होत नसल्याचे तेथील वैद्यकीय सूत्रांनी सांगितले. त्यामुळे बाई गंगाबाई महिला रुग्णालयातीलच अतिदक्षता विभागात तिला हलविण्यात आले.

तिथे उपचार सुरू असतानाच पौर्णिमाने २९ मार्च रोजी रात्रीला जगाचा निरोप घेतला. या घटनेनंतर कुठे हळहळ, तर कुठे आरोग्य व्यवस्थेवर संताप व्यक्त केला जात आहे. उल्लेखनीय म्हणजे, एका बाजूला मुंबईहून सहसंचालक येऊन बैठका घेतात, आढावे घेतात आणि मसर्व काही सुरळीतफअसल्याचे चित्र रंगवतात. मात्र, प्रत्यक्षात अशा घटना घडत असल्याने प्रशासनाच्या दाव्यांवर शंका उपस्थित होत आहे. कागदोपत्री व्यवस्थापन आणि प्रत्यक्ष सेवा यामध्ये मोठी तफावत असल्याचे चित्र या घटनेतून समोर आले आहे.

# नक्षल चळवळ सोडून नंदूने परत यावे,डाव्या पक्षांचेही माओवाद्यांना आवाहन

**गडचिरोली :–** जिल्ह्यात पोलिसांच्या रेकॉर्डनुसार शिल्लक असलेल्या ६ माओवाद्यांपैकी जयराम उर्फ नंदू मोंगे गावळे हा एकमेव गडचिरोली जिल्ह्या–तील रहिवासी आहे. उर्वरित ५ जण हे छत्तीसगडचे रहिवासी आहेत. नक्षलवाद्यांचे सर्व मोठे नेते दलम सोडून गेले. आता जंगलात राहण्यापेक्षा चळवळ सोडून नंदूने घरी परत यावे, असे भावनिक आवाहन जयराम उर्फ नंदूचे वडील मोंगो गावळे यांनी केले आहे.

एट्टापल्ली तालुक्यातील गिलनगुडा गावातील गावळे यांच्या घरी जाऊन शेतकरी कामगार पक्षाचे नेते रामदास जराते, मार्क्सवादी कॅाम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सचिव अमोल मारकवार, भारतीय कॅाम्युनिस्ट पक्षाचे जिल्हा सहसचिव सचिन मोतकुरवार यांनी माओवादी नंदूच्या वडीलांची भेट घेऊन त्यांच्या भावना जाणून घेतल्या. यावेळी त्यांनी हे आवाहन नंदूला उद्देशून केले.अनेक वर्षांपूर्वी घरकामाबद्दल रागावल्याच्या कारणावरून नंदू घर सोडून गेला आणि नक्षल दलममध्ये भरती झाला. तेव्हापासून तो घरीच आलाच नाही, अशी माहिती मोंगे गावळे यांनी दिली.

### डाव्या पक्षांचेही माओवाद्यांना आवाहन

भारत हा लोकशाहीवादी देश असून संविधानिक पध्द–तीने चालत आलेला आहे. येथे बंदुकीच्या जोरावर सामान्य माणसाला न्याय मिळण्याची शक्यता नाही. त्यामुळे जंगलात उरलेल्या नक्षलवाद्यांनी बंदुकीचा मार्ग सोडून लोकशाही मार्ग स्विकारावा, असे आवाहन गडचिरोलीतील डाव्या पक्षांची केले आहे. देशाच्या गृहविभागाने ३१ मार्च हा नक्षलवाद्यांसाठी शेवटचा अल्टीमेटम दिला होता. या पार्श्वभूमीवर एटापल्ली तालुक्याच्या संपर्क दौऱ्यावर असलेले शेकाप आणि माकपा–भाकपाच्या पदाधिकाऱ्यांनी गिलनगुडा येथे जाऊन नंदूचे वडील मोंगे गावळे यांच्याशी चर्चा केली. जयरामने बंदुकीचा त्याग करून लोकशाहीचा मार्ग स्विकारावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.



बंदुकीच्या जोरावर संघर्ष करण्याऐवजी डाव्या पक्षांच्या नेतृत्वाखाली संसद, विधिमंडळ आणि रस्त्यावरचा संघर्ष करावा. बंदुकीचा त्याग करून लोकशाही मार्गाने जनतेसाठी कामे करु इच्छिणाऱ्यांचे, आत्मसमर्पितांचे आम्ही आमच्या पक्षात स्वागत करु. त्यामुळे गडचिरोली जिल्ह्यातील शेवटचा नक्षलवादी आणि त्याच्या समर्थकांनी बंदुकीचा त्याग करावा, असे आवाहनही रामदास जराते, अमोल मारकवार, सचिन मोतकुरवार, सुरज जक्कुलवार यांनी केले आहे.

# चोरखमारा जलाशयातून पाणी सोडण्यास सुरवात




**तिरोडा:–** उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर एप्रिल व मे महिन्यांत निर्माण होणाऱ्या संभाव्य पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी तिरोडा क्षेत्रात तातडीने उपाययोजना राबविण्यात आली आहे. आमदार विजय रहांगडाले यांच्या पुढाकारामुळे बुधवारी चोरखमारा जलाशयातून नाल्यात पाणी सोडण्यास सुरवात झाली असून, या निर्णयामुळे परिसरातील नागरिक व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

दरवर्षी तालुक्यातील गावांत उन्हाळ्यात पाण्याची टंचाई तीव्र होते. विहिरी, बोअरवेल आणि स्थानिक जलस्रोत कोरडे पडू लागल्याने नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी तसेच शेतीसाठी मोठ्या अडचणींचा सामना करावा लागतो. या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार रहांगडाले यांनी प्रशासनाशी समन्वय साधून जलाशयातील पाणी नाल्याद्वारे सोडण्याचा निर्णय घेतला.या उपक्रमामुळे नाल्यालगतच्या परिसरातील विहिरी व जलस्रोतांची पातळी वाढण्यास मदत होणार असून, शेतीसाठी आवश्यक अस–लेला पाणीपुरवठा काही प्रमाणात सुरळीत होण्याची शक्यता आहे. इतर पिकांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनाही याचा मोठा फायदा होणार आहे. तसेच जनावरांच्या पाण्याच्या गरजाही भागण्यास मदत होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# लोकार्पण करूनही आसोली येथील ई–लायब्ररी कुलूपबंद

**गोंदिया :–** ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक परीक्षांचा अभ्यास करण्याची सोय व्हावी म्हणून गावात ई–लायब्ररी ची इमारत तयार करण्यात आली. तीन महिन्यापूर्वी सदर इमार–तीचे थाटात लोकार्पण सुद्धा करण्यात आली परंतु या इमारतीत विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या सुविधाच पुरविल्या गेल्या नसल्याची धक्कादायक माहिती तालुक्यातील आस–ोली येथे उघडकीस आली. त्यामुळे लाखोंची इमारत बांधकाम विद्यार्थ्यांसाठी की कंत्राटदारासाठी असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे.




ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक परी–क्षेत यश मिळवावे या उद्देशाने स्थानिक आमदार विनोद अग्रवाल यांच्या पुढाकाराने खनिज विभाग योजना अंतर्गत आसोली येथे जवळपास ३५ लाखाच्या निधीतून इमारत बांधकाम व त्यात जवळपास १५ लाख रुपयांचे अभ्यासाचे साहित्य मंजूर करण्यात आले. सदर कामाचे कंत्राट आमदार महोदयांच्या मर्जीतील अग्रवाल नामक कंत्राटदाराला देण्यात आले. सदर कंत्राटदाराने मागच्या

तीन महिन्या पूर्वी इमारत बांधकाम पूर्ण करून या इमारतीचे आमदार विन–ोद अग्रवाल यांच्या हस्ते थाटात लोकार्पण सुद्धा उरकविले. मात्र सदर इमार–तीत विद्यार्थ्यांसाठी सांगणारे साहित्य, विज, पाणी व्यवस्था अपुरी ठेवण्यात आली. त्यामुळे येथील विद्यार्थी बाजूच्या बचत भवनात बसून अभ्यास करीत आहेत.

जर अभ्यासासाठी सुविधाच मिळत नसतील तर इमारत बांधून उपयोग काय ? असा प्रश्न येथील नागरिकांनी उपस्थित करीत आमदार महोदयांनी केलेल्या लोकार्पनावरच शंका निर्माण केली आहे. त्यामुळे सदर बांधकाम फक्त कंत्राटदारांचे पोषण करण्यासाठीच काय ? असा प्रश्न पुन्हा एकदा उभा ठाकला आहे.

# ३५ वनउपज तपासणी नाक्यांवर 'संक्रांत'

**गोंदिया:–** आंतरराज्य सीमेवर मुख्य – तपासणी नाके असल्याने सीमेच्या आत असलेले वनउपज तप–ासणी नाके निकामी ठरू लागले आहेत. दुसरीकडे वनवृत्तात मानव–वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. त्यामुळे हे तपासणी नाके बंद करून येथील – कर्मचाऱ्यांचा वनक्षेत्रात रिक्त पदांवर वापर केल्यास काही प्रमाणात या घटनांवर आळा घालण्यात मदत होणार आहे. तेव्हा नागपूर वनवृत्तात येणारे ना–गपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा येथील ३५ वनउपज तपासणी नाके बंद करण्याचा निर्णय वन विभागाकडून घेण्यात आला आहे. दरम्यान, येत्या ३० एप्रिलपर्यंत हे तपासणी नाके बंद करण्याचे निर्देश संबंधितांना देण्यात आले आहे.

वनसंरक्षक (प्रादेशिक) यांनी – जारी केलेल्या पत्रकानुसार आंतरराज्य सीमेवर आधीच मुख्य तपासणी नाके कार्यरत आहेत. तेथे वाहनांची तप–ासणी होत असल्याने अंतर्गत भागात पुन्हा नाके लावून तपासणी करण्याची आवश्यकता नसल्याचे प्रशासनाचे मत आहे. अनेक नाक्यांवर कर्मचारी २४ तास ड्युटी करून दोन दिवस गैरहजर राहत असल्याचे दिसून आले आहे. यामुळे नाकाबंदी आणि वाहन तपासणीची कामे योग्यरितीने होत नव्हती. गेल्या ३ ते ४ वर्षांत या अंतर्गत तपासणी नाक्यांवर कोणत्याही प्रकारची ठोस कारवाई झाल्याची नोंदही नाही.

दुसरीकडे नागपूर वनवृत्तात मानव–वन्यजीव संघर्षाच्या घटनांमध्ये वाढ झाली आहे. अनेक बीट रिक्त असल्याने तपासणी नाक्यांवरील कर्मचाऱ्यांना या रिक्त पदांवर तैनात केल्यास वन्यजीव संरक्षणास आणि संघर्ष टाळण्यास मोठी मदत होणार आहे. दरम्यान, नागपूर वनवृत्तात येणारे नागपूर वन विभागातील ९ तपासणी नाके, भंडारा ८, गोंदिया ७व वर्धा वन विभागातील ११ असे ३५ वनउपज तपासणी नाके बंद करण्याचा निर्णय संबंधित विभागाकडून घेण्यात आला आहे. येत्या ३० एप्रिलपर्यंत हे तपासणी नाके बंद करण्याच्या सूचना संबंधित उपवनसंरक्षकांना देण्यात आल्या आहेत.

### हे नाके होणार बंद

**बंद करण्यात येणाऱ्या नाक्यांमध्ये ना–गपूर वन विभागातील बुटीबोरी, वाडी, भिवापूर, कापसी (भंडारा रोड), कोराडी, कामठी, वर्धा, काटोल रोड, दिघोरी. भंडारा वन विभागातील निलज, कारधा, कालागोटा, गिरोला, कांद्री, लवादा, खापा, चिचोली. गोंदिया वन विभागातील परसटोला, नवेगावबांध, आमगाव, सालेकसा रोड आमगाव, कोरणी, कुडवा, फुलचूर तर वर्धा वन विभागातील वाढोणा, रोहणा, बांगडापूर, खरांगण, तळेगाव, हेटी कुडी, रहाटी, पिलापूर, शिवनफ ळ, वानरचुवा, खेक हे तपासणी नाके बंद होणार आहेत.**



# कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांच्या पोषण आहाराकडे विशेष लक्ष द्यावे

## डॉ. दिपक सावंत टास्क फोर्स कुपोषण निर्मुलन आढावा सभा



**गोंदिय :–** जिल्ह्या–तील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्यासाठी बालकांचे पोषण आहार व मुलींचे रक्तातील हिमोग्लोबीनचे प्रमाण वाढविण्यासाठी विशेष लक्ष द्यावे, अशा सूचना राज्याचे टास्क फोर्स कुपोषण निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. दिपक सावंत यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात आज टास्क फोर्स कुपोषण निर्मूलन व संसर्गजन्य आजार नियंत्रणाबाबत आढावा घेण्यात आला, यावेळी ते बोलत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी भैय्यासाहेब बेहेरे, प्रभारी जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी प्रमिला जाखलेकर, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजित गोल्हार, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले, आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी उमेश काशिद, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (महिला व बाल कल्याण) किर्तीकुमार कटरे, शिक्षणाधिकारी (माध्यमिक) सुधीर महामुनी, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) विशाल डोंगरे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता यांचे प्रतिनिधी डॉ. विनायक रुखमोडे उपस्थित होते.

डॉ.सावंत म्हणाले, जिल्ह्या–तील शासकीय अनुदानीत व विनाअनुदानीत आश्रमशाळे–तील प्रत्येक मुलींच्या रक्तातील हिमोग्लोबीनची तपासणी दर तीन महिन्यांनी झालीच पाहिजे. गाव पातळीवरील आशा सेविका, अंगणवाडी सेविका व आरोग्य सेविका यांनी त्यांच्या कार्यक्षेत्रातील गरोदर व स्तनदा माता यांची गृहभेटी दरम्यान विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. तसेच अंगणवाडीतील बालकांचे वजन व उंची वाढविण्यासाठी मुलांच्या पोषण आहारावर विशेष भर देण्यात यावा असे त्यांनी सांगितले.

डॉ. सावंत पुढे म्हणाले, जिल्ह्यातील कुपोषणाचे प्रमाण कमी करण्याच्या दृष्टीने आरोग्य, महिला व बाल कल्याण, आदिवासी विकास प्रकल्प, शिक्षण व पंचायत विभाग यांनी लोकसहभागातून काम करण्याची गरज आहे.

अंगणवाडी सेविका यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सॅम व मॅम मुलांकडे विशेष लक्ष देऊन कुपोषित बालकांना उपचारासाठी जवळच्या पोषण आहार पुनर्वसन केंद्रात भरती करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.

अंगणवाडीतील प्रत्येक बालकांचे किमान तीन वेळा वजन घेऊन त्यांची सॅम व मॅम श्रेणी ठरविण्यात यावी. बालकांना त्यांच्या आवडीचे पौष्टिक आहार देण्याकडे विशेष लक्ष द्यावे. माता व बाल मृत्यू कमी करण्याच्या दृष्टीने आरोग्य विभागाने विशेष दक्षता घेणे गरजेचे आहे, त्यासाठी लोकांमध्ये प्राथमिक प्रतिबंधात्मक उपाययोजनांची जनजागृती करण्यावर भर देण्यात यावा, असे त्यांनी यावेळी सांगितले. प्रास्ताविक व सादरीकरण जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. अभिजित गोल्हार यांनी केले.

आढावा बैठकीस अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तृप्ती कटरे, सहायक संचालक (कुष्ठरोग) डॉ. महेंद्र धनविजय, जिल्हा हिवताप अधिकारी डॉ. विनोद चव्हाण, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ. निरंजन अग्रवाल, गोंदिया तालुका आरोग्य अधिकारी निलेश जाधव, बालरोग तज्ञ डॉ. लिना धांडे व डॉ. सचिन उईके, वैद्यकीय अधिष्ठाता डॉ. निकिता पोयाम, आयईसी विभागाचे प्रशांत खरात यांचेसह आरोग्य विभाग, केटीएस सामान्य रुग्णालय व बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयातील अधिकारी उपस्थित होते.

# ५७८ बालके अतितीव्र कुपोषित

**गोंदिया:–** कुपोषणमुक्त महाराष्ट्रासाठी राज्य शासनाकडून अनेक उपाययोजना केल्या जात आहे. मात्र, गोंदिया जिल्ह्यातील कुपोषण आजही कमी होताना दिसत नाही. जिल्ह्यात आजच्या स्थितीत ०.८९ टक्के बालके कुपोषित आहे. कुपोषणमुक्तीसाठी शासनाने सुरू केलेले राजमाता जिजाऊ कुपोषणमुक्त अभियान जिल्ह्यात अपयशी ठरले. गोंदिया जिल्ह्यात फेब्रुवारी अखेरपर्यंत कुपोषित बालकांची आकडेवारी पाहिल्यास कुपोषणाचे प्रमाण ज्या पद्धतीने कमी होणे अपेक्षित होते, ते झालेले दिसत नाही. जिल्ह्यात ५७८ बालके अतितीव्र कुपोषीत असून, सर्वाधिक कुपोषितांचे प्रमाण गोंदिया तालुक्यात असून, त्याची टक्केवारी ६१ इतकी आहे. तरीही जिल्हा प्रशासनाकडून अंगणवाडीच्या माध्यमातून कुपोषण निर्मूलनाचे प्रयत्न केले जात आहे.

जिल्ह्यात फेब्रुवारी २०२६ पर्यंत कमी वजनाची ३ हजार ७७१ बालके तर अतितिव्र कमी वजनाची ५७८ बालके आढळली. मागील तेरा वर्षाची आकडेवारी बघितली तर जिल्ह्यात कुपोषितांचे प्रमाण काही अंशी कमी झाल्याचे बघायला मिळते.

**जिल्ह्यात कुपोषणाची आकडेवारी**

| तालुका | सर्वेक्षित बालके | साधारण बालेक | मध्य वजन | तीव्र वजन |
|---|---|---|---|---|
| गोंदिया | २१,६५६ | १७,४०६ | ७७३ | १३४ |
| तिरोडा | १०,२३४ | ८,०६४ | ४०४ | ५१ |
| गोरेगाव | ८०९२ | ६४५९ | २५१ | ३१ |
| आमगाव | ६६७३ | ५१९६ | ४३० | ५४ |
| सालेकसा | ६४४७ | ५०११ | ३६३ | ४१ |
| देवरी | ८२३१ | ६३४४ | ४२९ | ९६ |
| सडक अर्जुनी | ७७९२ | ६००० | ४०४ | ५० |
| अर्जुनी मोरगाव | ८७०४ | ६२९७ | ११७ | १२१ |
| एकूण | ७७८२९ | ६०७७७ | ३७७१ | ५७८ |

### जिल्हा कुपोषणमुक्तीसाठी प्रभावी उपाययोजनांची गरज

जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास विभाग आणि आरोग्य विभागाच्या वतीने प्रभावी उपाययोजना राबविण्याची गरज निर्माण झाली आहे. आदिवासी बहुल गावे, वाड्यांमध्ये कुपोषितांचे प्रमाण सर्वाधिक असल्याचे आरोग्य विभागाने दिलेल्या आकडेवारीवरून स्पष्ट होत आहे. त्यामुळे या गावात पभावी उपाययोजना राबविण्याची आवश्यकता आहे.

आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त भाग असलेल्या वाड्या व वस्त्यांमध्ये सर्वाधिक लक्ष केंद्रीत करण्यात आले आहे. त्यामुळेच जिल्ह्या–तील कुपोषितांच्या प्रमाणात घट झाली आहे. जिल्हा कुपोषणमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग कटिबद्ध असून,सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत.

**– डॉ. अभिजित गोल्हार,** जिल्हा आरोग्य अधिकारी, जिप गोंदिया